१९२५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२०६
REFBK-0006625

म. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
12७६
[redacted]

॥ श्री ॥

# प्रतिनिधी घराण्याचा इतिहास

# परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी

## यांचें चारित्र

12७६

लेखक व प्रकाशक
**वामन परशराम मेहेंदळे, औंध.**

मुद्रक—रामचंद्र मोरेश्वर घोटवडेकर
"श्री शेतकरी" प्रेस, सदाशिव पेठ ५२०,
पुणें शहर.

**एप्रिल १९१७.**

औंध संस्थानच्या शाळाखात्यासाठीं मंजूर झालेला

# प्रतिनिधी घराण्याचा इतिहास

## परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचें चरित्र

लेखक
वामन परशराम मेहेंदळे.

आवृत्ति १ ली प्रती २०००

मुद्रक—रामचंद्र मोरेश्वर घोटवडेकर
“ श्री शेतकरी ” प्रेस. सदाशिव पेठ ५२०,

REFBK-0006625

प्रकाशक—वामन परशराम मेहेंदळे, औंध,
औंध संस्थान, जिल्हा सातारा

किंमत ४ आणे

# प्रस्तुत पुस्तकांत ज्यांतील आधार दिले आहेत त्या ग्रंथांची यादी.

१ दापरेकृत प्रतिनिधि घराण्याचा इतिहास (अग्निहोत्रि यांचे छापखान्यांत इ. स. १८६७ सालीं छापलेला)
२ राजवाडे यांचीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.
३ खरे यांचे ऐतिहासिक लेखसंग्रह.
४ मराठी रियासत (रा. सरदेसाई)
५ काव्येतिहाससंग्रह.
६ ब्रह्मेंद्र स्वामींचें चरित्र व भारतवर्ष (पारसनीस)
७ इतिहास संग्रह (पारसनीस)
८ हरिवंशाची बखर (रा. खरे)
९ ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर.
१० शाहू महाराजांची रोजनिशी (डे. व्ह. ट्रा. सोसायटी)
११ भारत–इतिहास–संशोधक मंडळाचे सर्व ग्रंथ व मंडळाचे संग्रहीं असलेली साधनसामुग्री.

५-८०-

॥ श्री ॥

हें पुस्तक

श्रीमंत राजश्री भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंडित

पंत प्रतिनिधी बी. ए. संस्थान औंध

यांचे सेवेसी

स्वामिभक्तिपूर्वक

श्रीमंतांचे परवानगीनें

अर्पण केलें असे.

श्रीमंत भवानराव पंडित प्रतिनिधी बी. ए. संस्थान औंध.



जन्म
कार्तिक शुद्ध ९ शके १७९०

आधिकार प्राप्ती
आश्विन वद्य ७ शके १८३१

# अनुक्रमणिका

पृष्ठें.

औंध संस्थानच्या भूगोलासंबंधी माहिती १-१२
प्रतिनिधीची वंशावळ १३-१६
भाग १ ला—मराठी राज्याचा पूर्वेतिहास व प्रतिनिधि-पदाची उत्पत्ति .... .... १७-२८
भाग २ रा—परशुरामपंतांचा जन्मेतिहास, मराठ्यांचे दरबारीं त्यांचा प्रवेश, त्यांचीं शूरत्वाचीं कृत्यें, पन्हाळयावरील स्वारी .... २९-३८
भाग ३ रा—परशुरामपंतांस प्रतिनिधिपदाची प्राप्ति, मोगलांवरील स्वाऱ्या, औरंगजेबाचा मृत्यु ३९-५३
भाग ४ था—परशुरामपंतांची कारकीर्द, कोल्हापुरास मराठेशाईच्या गादीची स्थापना, परशुरामपंतावरील संकटें व त्यांच्या कारकीर्दीचा शेवट .... ५३-६९
भाग ५ वा—उपसंहार. .... .... ६९-७३

# प्रस्तावना

प्रतिनिधी ह्मणजे राजाची प्रतिमा. सिंहासनाधीश महाराजांच्या ऐवजीं कोणत्याहि कागदपत्रावर शिक्का मोर्तब करण्याला किंवा हरएक विचार, काम किंवा हुकूम करण्याला कारणपरत्वें ज्यास अधिकार दिलेला असतो तो " **प्रतिनिधी** " होय. प्रतिनिधीचा शिक्का असला ह्मणजे ती अस्सल राजमुद्राच समजावी.

" **प्रतिनिधी** " घराण्याचा इतिहास ह्मणजे मराठ्यांच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाचा भाग होय. पण शेवटचे पेशवे राव बाजी यांचे सरदार बापूजी गणेश गोखले यांनीं प्रतिनिधींच्या दफ्तराचा विध्वंस केल्यामुळें व थोडेंबहूत शिल्लक राहिलेलें दफ्तर मेहेरबान हर्नि साहेब बहादूर यांनीं साताऱ्यास नेल्यामुळें, औंध संस्थानाचे दफ्तरांत इतिहास लिहिण्याचे उपयोगीं असे जुने कागदपत्र मुळींच नाहींत ह्मटलें तरी चालेल. सबब या घराण्याचा इतिहास बाहेरून माहिती मिळवून लिहावा लागला!

प्रतिनिधी घराण्याचा इतिहास इ. स. १८६७ सालीं रा. गोपाळ बल्लाळ ढापरे वकील सातारा. नि॥ प्रतिनिधी यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. त्या इतिहासांत साद्यंत अशी हकीकत नसून अगदीं त्रोटक आहे. त्यानंतर इ. स. १९०३ सालीं रा. दत्तोपंत पारसनीस यांनीं स्वल्पमूल्य चरित्रमालेपैकीं प्रथम पुष्प ह्मणून परशुराम त्रिंबक प्रतिनिधींचें चरित्र, ज्या चरित्रास थोडीबहूत माहिती पुरविण्याचें काम

प्रस्तुत लेखकानें केलें होतें तें, प्रसिद्ध केलें. हे दोन्ही प्रयत्न अपुरे झाले असल्यामुळें आपल्या घराण्याचा विस्तृत व साद्यंत इतिहास लिहून तयार करण्याची, हल्लींचे औंध संस्थानचे अधिपति श्रीमंत भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधी यांना इच्छा झाली व त्याप्रमाणें श्रीमंत त्या स्तुत्य प्रयत्नांत आहेत. “ ज्यानें दिलें अन्न तयासि गावें ” ह्या राजकव्युक्तीप्रमाणें प्रतिनिधी घराण्याचा इतिहास लिहिण्याचे कामीं कांहीं साधनें मिळविण्याची आपल्या हातून मदत झाल्यास करावी, अशी इच्छा उत्पन्न होऊन, श्रीमंतांचे सेवेशीं विनंती केली व त्यांनीं मेहेरनजरेनें हुकूम केल्यावरून प्रतिनिधी घराण्याचा इतिहास लिहिण्यास उपयोगीं पडतील अशीं साधनें मिळवून, हा औंध संस्थानच्या शाळाखात्याकरितां लहानसा इतिहास लिहिण्यास सुरवात केली आहे.

ज्यांनीं रामेश्वरापासून अटकेपर्यंत भगवा झेंडा नाचविला, ज्यांनीं गिलचे, रोहिले, पठाण, रजपूत इत्यादि शूर लोकांच्या फौजा शेंकडों वेळां लढाईंत गाठून, मारून, तुडवून धुळीस मिळविल्या ; दूरदूरच्या प्रांतांतील मानी व प्रतापी राजांचीं सिंहासनें ज्यांच्या विजयदुंदुभीच्या नादानें भीतीनें हदरूं लागत, त्या महाराष्ट्रवीरांनीं काय काय पराक्रम केले ते लिहून ठेवण्याचें काम आमच्याकडील बखरकारांनीं अल्पस्वल्प केलेंच आहे.

काव्येतिहाससंग्रह सुरू होऊन जेव्हां निरनिराळ्या बखरी व अत्यंत महत्वाचे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले त्या वेळीं आपल्या पूर्वजांचें शौर्य, मुत्सद्दीपणा, स्वधर्मनिष्ठा इत्यादि सद्गुणांची चांगल्या

रीतीनें ओळख पटली. त्या वेळेपासून मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें मिळविण्यासंबंधानें प्रयत्न होऊन इतिहासशास्त्रपारंगत रा. रा. राजवाडे, रा. रा. वासुदेवशास्त्री खरे, व रा. ब. पारसनीस वगैरे मंडळींनीं इतिहास साधनांचे भागच्या भाग छापून प्रसिद्ध केले आहेत. त्या सर्वांचा आधार घेऊन व पुणें येथील भारत–इतिहास–संशोधक मंडळाचे सहाय्यानें हें संक्षिप्त टांचण तयार केलेलें आहे.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें छापून प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न ज्या इतिहासभक्तांनीं केलेला आहे त्यांना इ. स. १७५० पासून पुढील कागदपत्र चांगल्या प्रकारें संगतवार हकिकत लिहिण्यासारखे सांपडलेले आहेत. त्यांतील कांहीं साधनें प्रसिद्ध झालेलीं आहेत व कांहीं होत आहेत. परंतु, श्रीशिवछत्रपतीपासून श्रीराजाराम छत्रपतींच्या अखेरी पर्यंतचे संगतवार कागदपत्र न सांपडल्यामुळें त्या कालचा इतिहास लिहिण्यास मोठी अडचण पडते. आणि तीच अडचण प्रस्तुत लेखकासही आली. म्हणून जेवढे कागदपत्र उपलब्ध आहेत तेवढ्यांचाच उपयोग केला आहे. ज्या ठिकाणीं परस्पर विरुद्ध माहिती मिळाली तेथें वाटलेलें प्रधान अंग आधीं देऊन गौण वाटलेल्या माहितीचा भाग टिपेंत दाखल केला आहे.

सदरहू टांचणास वास्तविक इतिहास हें नांव शोभत नाहीं. यांत संपूर्ण माहिती आलेली नसून फक्त लढाया, राजकीय घडामोडी एवढ्यांचाच समावेश झालेला आहे. ज्यांचा इतिहास उपलब्ध आहे त्यांचे आचार, विचार, धर्मसमजुती, सामाजिक व्यवहार, नीतिमत्ता, विद्याव्यासंग या गोष्टींचा विचार करण्याइतके कागदपत्र

नाहींत; इतकेंच नव्हे तर, तशा प्रकारच्या विचारानें एखाद्या पुरुषाची माहिती लिहून ठेवण्याची सुद्धां चाल नव्हती, यामुळें तशी माहिती देतां आली नाहीं. ह्मणून या इतिहासास " इतिहास " ह्मणण्यापेक्षां प्रतिनिधी घराण्यांच्या इतिहासाच्या साधनाचें " टिपण " असें म्हटलें तरी चालेल.

कोणत्याहि संस्थानचा इतिहास लिहितांना आरंभीं भूगोलासंबंधानें माहिती द्यावी लागते, किंबहुना तदभावी तो इतिहास अपुराच होय, ह्मणून ती दिली आहे. त्यांत पूर्वींच्या व हल्लीं जो मुलूख संस्थानचे वहिवाटीस आहे त्या, भागांचें वर्णन केलेलें आहे.

इतिहासलेखकाचें अंतःकरण विकारवश होतां उपयोगी नाहीं, ह्या तत्वास अनुसरून हें टांचण करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्मणजे गुणांचे ठिकाणीं गुण व दोषांचे ठिकाणीं दोष दाखविलेले आहेत. तथापि, मनुष्यस्वभावानुरूप त्याच्यांतहि कांहीं दोष राहिले नसतील असें नाहीं; पण ते कोणीं दाखविल्यास पुढील आवृत्तींत दुरुस्त केले जातील. तयार केलेल्या योजनेप्रमाणें संस्थानचे संस्थापक परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचीच कारकीर्द या भागांत पुरी केली आहे.

शेवटीं ज्या विद्याप्रिय अधिपतींच्या संतोषकारक सेवेंत मनःस्वास्थ्य प्राप्त झाल्यामुळें औंध संस्थानच्या शाळाखात्यासाठीं " प्रतिनिधी " घराण्याचा संक्षिप्त इतिहास लिहिण्यास आरंभ झाला त्या श्रीमंत रा० बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधी यांच्या कृपाप्रसादाचें हें फल आहे, असें सांगून व त्यांचे उपकार स्मरून हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

औंध, अश्विन शु॥ १० शके १८३७.
ता० १७ माहे आक्टोबर सन १९१५.

पुस्तककर्ता.

सं. ८-११७

# औंध संस्थानच्या भूगोलासंबंधीं माहिती

६६२५

## पूर्वीची माहिती

मूळ पुरुष परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांना श्रीशाहुमहाराजांनीं १६ सुभे आणि ३५ किल्ले दिले.

अथणी येथील प्रसिद्ध उदाजीराव चव्हाण याजवर श्री शाहुमहाराजांनीं इ० स० १७२९ मध्यें श्रीनिवास परशुराम ऊर्फ श्रीपतराव प्रतिनिधी यांस स्वारी करण्यास पाठविलें. तींत चव्हाणाचा पराभव झाल्यावर चव्हाणाकडील मुलूख प्रतिनिधींचे ताब्यांत आला.

परशुराम त्रिंबकाचे वेळेच्या मुलखाचें व चव्हाणाकडील मिळालेल्या मुलखाचें मिळून एकंदर उत्पन्न सुमारें ३०,००,००० ( तीस लक्ष ) रुपयांचें होतें.

श्रीशाहुमहाराजांचे मृत्यूनंतर सदाशिवराव भाऊसाहेब यांनीं सांगोल्यावर स्वारी केली त्या वेळीं जगजीवनराव प्रतिनिधी व त्यांचे मुतालीक यमाजी शिवदेव हे सकवारबाई (श्रीशाहुमहाराजांची स्त्री) च्या पक्षाचे असलेमुळें प्रतिनिधींच्या मुलखापैकीं बराचसा मुलूख सदाशिवराव भाऊंनीं जप्त केला (इ० स० १७५३).

थोरले माधवरावसाहेब पेशवे यांचे कारकीर्दींत राक्षसभुवनची लढाई झाल्यानंतर भवानराव प्रतिनिधी यांना फौजेचे खर्चासाठीं

५,००,००० (पांच लाख) रुपयांचा सरंजाम पेशवे यांजकडून मिळाला.

श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव प्रतिनिधी यांचे चिरंजीव परशुरामपंत यांचे वहिवाटीस मुलूख होता तो:—

## किल्ले

१ व्याघ्रगड. २ सुंदरगड. ३ प्रतापगड. ४ नांदगिरी ऊर्फ कल्याणगड. ५ वर्धनगड. ६ महिपतगड. ७ वारुगड. ८ भैरवगड. ९ वसंतगड. १० सज्जनगड. ११ मंगळगड १२ मकरंदगड. १३ कैंजळ ऊर्फ मनमोहनगड. १४ जंगली जयगड. १५ भूषणगड. १६ महिमानगड. १७ मही्मदनगड. १८ मोरगिरी ऊर्फ गुणवंतगड. १९ मच्छींद्रगड. २० अवचितगड. २१ सुर्पेणगड. २२ गंभीरगड. २३ गहनगड. २४ संतोषगड. २५ वासोटा.

## महाल

१ कर्यात विटे. २ कसबे कांसेगांव. ३ सुभा सातारा. ४ सुभा जावली. ५ सुभा कराड. ६ सुभा वांई. ७ कसबें औंध. ८ प्रांत खटाव. ९ तर्फ कोळे. १० तर्फ किन्हई. ११ कसबें भाळवणी. १२ कसबें निमसोड. १३ तर्फ वारुण. १४ हवेली विजापूर. १५ कर्यात आटपाडी. १६ कसबें नाझरे. १७ कसबें वेळापूर. १८ नृसिंहगड. १९ खानापूर. २० बागेवाडी.

उत्तर हिंदुस्थानांत (बुंदेलखंडांत) रुळी व परगणे बिनायखा (प्रांत सागर).

येणेंप्रमाणें महाल व किल्ले असून यांचें उत्पन्न १८,००,००० (अठरा लक्ष) रुपये होतें. श्री० छत्रपतीकडे जमा होणाऱ्या वसुलास 'हुजूर-मामला' व प्रतिनिधीकडे जमा होत असलेल्या वसुलास 'जिल्हे-बाब' अशी संज्ञा होती.

परशुराम श्रीनिवास प्रतिनिधी यांचे घरगुती कलहांत पडून रावबाजींनीं प्रतिनिधींची सर्व जहागीर जप्त केली व शके १७३३ (इ. स. १८११) या सालीं जप्त केलेल्या जाहगिरीपैकीं दोन लक्षांचा मुलूख मोकळा करून प्रतिनिधीस दिला. तो बीतपशील :—

२२२८८॥≡ प्रांत कराड. ५१३८९ प्रांत विजापूर बाबती—अमलाचे महाल व गांव.

६१६१०॥।‑। प. बागेवाडी.

१२७३३॥≡॥। कर्यात औंध. ५१९७७ कर्यात आटपाडी.

एकूण.... २,००,०००

नंतर दुअमलीगांव व बाबती अम्मल मोबदला होऊन हल्लीं वहिवाटीस असलेला मुलूख आला; त्याचें संक्षिप्त वर्णन पुढें दिलें आहे.

या मोबदल्यांत प्रतिनिधींचे राजधानीचा गांव कऱ्हाड हा इ. स. १८५४ सालीं मोबदला झाल्यामुळें राजधानी औंध येथें आली.

## औंध संस्थानचें सामान्य वर्णन

औंध संस्थान हें सातारा जिल्ह्यांत आहे. याचा बराच भाग या जिल्ह्याचे आग्नेयेस असून थोडा भाग विजापूर जिल्ह्याचे नैर्ऋत्येस आहे. हें संस्थान ब्राह्मण संस्थानिकांच्या ताब्यांत असून त्यांना "पंडित प्रतिनिधी" असा हुद्दा आहे. श्रीमंत राजश्री परशुराम त्रिंबक कुलकरणी किन्हईकर हे या घराण्याचे मूळ पुरुष असून राजे श्री छत्रपति राजाराम महाराज यांचे कारकीर्दींत ते उदयास आले व त्यांचेच कारकीर्दींत त्यांनीं प्रतिनिधीची पदवी मिळविली. हल्लींचे संस्थानिक हे परशुराम त्रिंबकांचे सातवे वंशज आहेत. प्रतिनिधी पदाचा अधिकार हा अष्टप्रधानांचे अधिकारापेक्षां मोठा व छत्रपतींच्या बरोबरीचा म्हणजे छत्रपतींची केवळ प्रतिमाच, असा आहे.

औंध संस्थानचें क्षेत्रफळ ५०१ चौरस मैल असून त्याचे राजकीय विभाग औंध, किन्हई, संगममाहुली, कुंडल, आटपाडी व गुणदाळ असे सहा आहेत. या सहा विभागांत मिळून ७२ गांवें व ५५ वाडया आहेत लोकसंख्या सन १९११ इसवी सालचे खानेसुमारीप्रमाणें ६९,००० हजार आहे. त्यांत हिंदु ६५,६२४, मुसलमान ३,११५, जैन २२७, ख्रिश्चन १५ व इतर १९. ह्या संस्थानांत पर्वत, गड अथवा किल्ले नाहींत; लहान लहान टेंकडया व डोंगर आहेत.

**नद्या**—औंध तालुक्यांत नान्नी; किन्हई तालुक्यांत वांगना; कुंडल तालुक्यांत वेरळा, कृष्णा, मांड, नान्नी व तारळी; आटपाडी

तालुक्यांत माण आणि गुणदाळ तालुक्यांत कृष्णा व डोण; याप्रमाणें नद्या असून ज्या भागांतून कृष्णा नदी वाहात जाते तो भाग विशेष सुपीक आहे.

**मुख्य पिकें**—कापूस; गहूं, हरभरा, जोंधळे, बाजरी, भुईमूग, ऊस, जवस, करडी, धने, मटकी, तीळ, हीं आहेत. एकंदर संस्थानामध्यें सरसालांत सरासरीच्या मानानें २३ ते २५ इंच पाऊस पडतो.

**जनावरें**—आटपाडी तालुक्यांत हाणम जातीचे खिलारी बैल, गाई व काटक घोडीं; आणि गुणदाळ तालुक्यांत सोरटी बैल व गाई हीं प्रसिद्ध आहेत.

**कारखाने**—औंध येथें 'श्रीनिवास मेटल् वर्क्स' या नांवाचा लहानसा कारखाना आहे. ह्यांत पितळेचीं कुलपें व दुबैली नांगर तयार करण्याचें काम नुकतेंच सुरूं केलें असून तशा प्रकारचे नांगर व कुलपें तयार झालेलीं उपयोगांतहि येऊं लागलीं आहेत. किर्लोस्कर-वाडी (कुंडल) येथें किर्लोस्कर बंधूंचा शेतकीचीं आउतें तयार करण्याचा मोठा कारखाना आहे. त्यांत नांगर, कुळव, कडबा कापण्याचें यंत्र, मोटेचीं चाकें वगैरे जिन्नस उत्कृष्ट तयार होतात. कारखाना दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे.

**व्यापार**—गूळ, गहूं, बाजरी, जोंधळे, हरभरे, भुईमूग, कापूस, रंगविलेलीं कातडीं, करडीचें व करंज्याचें तेल, घोंगडीं, पासोड्या, लुगडीं वगैरे जिन्नस स्थानिक गरजा भागून परगांवीं दोन अडीच

लाखापर्यंत रवाना होतात; आणि सूत, कापड, साखर, राकेल तेल, मसाल्याचे जिन्नस, सोनें, चांदी, तांब्या-पितळेचीं भांडीं, वगैरे जिन्नस पांच लाख रुपयांपर्यंत बाहेरून येतात.

**लोकस्थिति**—या संस्थानांतील आटपाडी व गुणदाळ ह्या तालुक्यांत धनगर, कोळी, कुणबी, चांभार, ढोर वगैरे जातींच्या लोकांची वस्ती फार असून ते विद्याहीन आहेत. ते आपला निर्वाह शेतकीवर, गुरें, मेंढरें राखून व कातडीं विकून करितात. बाकी तालुक्यांतील लोक शेतकी, व्यापार व किरकोळ धंदे करून आपलें पोट भरतात. हे लोक साधारणपणें सुशिक्षित आहेत.

**शिक्षण**—संस्थानांतील मोठमोठ्या वस्तीच्या ठिकाणीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापन केल्या आहेत. शेतकरी वर्गास फीची माफी केलेली आहे. औंध येथील हायस्कुलांत चार आणे फी असून कोणत्याहि जातीच्या विद्यार्थ्यास मोफत जेवण घालून इंग्रजी शिकवितात. शाळाखात्यावर देखरेख ठेवण्यास व मास्तरांच्या नेमणुका वगैरे करण्यास एज्युकेशनल् इन्स्पेक्टर नेमिलेले आहेत.

औंध संस्थानचें सर्व बाबींचें उत्पन्न सुमारें ३,२५,००० रुपये आहे. त्यांत जमीनबाब, सायरबाब, लोकलफंड मिळून जमाबंदीचें उत्पन्न सुमारें २,७३,१०० रुपये आहे. त्यांतून दुमालदार, इनामदार, देवस्थान, धर्मादाय वगैरे इनाम ६९,५०० वजा केले असतां २,०३,६०० रुपये उत्पन्न आहे.

इनामदारांची जमाबंदी ६९,५०० रुपये धरली आहे. त्यांत आट-

पाडी तालुक्यांतील करगणी गांव ५००० रुपये आकाराचा असून तो प्रतिनिधी सरकारचा खाजगी उत्पन्नाचा आहे.

वतनबाब व देशपांडेपणाचा हक्क मिळून २००० रुपये प्रतिनिधी सरकारचें खाजगी उत्पन्न आहे.

बावती अम्मल सरदेशमुखी या बाबींचें उत्पन्न ३२०० रु. आहे.

अफू, गांजा, दारु, मीटमोडा वगैरे किरकोळ बाबींचा वसूल ४५,६०० रुपये आहे. तो हुजूर जमाबंदींत धरिलेला आहे.

औंध संस्थानचे ६ राजकीय विभाग आहेत. प्रत्येक विभागांत मुलकी व म्याजिस्ट्रेटी अधिकार चालविणारे कामगार आहेत. औंध, किन्हई व संगममाहुली येथील अधिकाऱ्यांस अनुक्रमें ठाणेदार, कमाविसदार व वहिवाटदार असें म्हणतात. कुंडल, आटपाडी, गुणदाळ येथील अधिकाऱ्यांस मामलेदार असें ह्मणतात. औंध, किन्हई, कुंडल, माहुली व आटपाडी येथील दिवाणी काम करण्यासाठीं एक मुनसफ नेमिले आहेत. त्यांचें कोर्ट मुदती मुदतीनें फिरत असतें. गुणदाळ तालुक्यांतील दिवाणी कामाचा अधिकार मामलेदार यानांच दिलेला असतो. हिशेबी खात्याकडे "दप्तरदार" या हुद्याचे अधिकारी आहेत. त्यांच्याकडे सर्व खात्यांतील हिशेब तपासण्याचें काम असून त्यांनाच औंध येथील म्याजिस्ट्रेटी कामाचा अधिकार आहे. सर्व खात्यांवर देखरेख ठेवण्यासाठीं "कारभारी" या हुद्याचे एक वरिष्ठ अम्मलदार आहेत. त्यांचेकडे वसुलाचें काम असून औंध संस्थानचे डि. म्याजिस्ट्रेटाचा व डि. जज्जाचाहि अधिकार

आहे. संस्थानिकांचा अम्मल संस्थानांत सर्वत्र सर्व बाबतींत चालतो. कारभारी यांचेवरील सर्व अपिलें संस्थानिकांपुढें चालतात. संस्थानावर सातारा पोलिटिकल एजंटाची पाहणी असते. वर्षांतून एक वेळां त्यांची स्वारी औंध येथें येत असते. सार्वभौम सरकारास कांहीं खंडणी द्यावी लागत नाहीं.

---

# औंध संस्थानची विशेष माहिती

## ठाणें औंध

**सीमा**—पूर्वेस, पश्चिमेस, उत्तरेस व दक्षिणेस खटाव तालुका आहे.

**गांवें**—औंध, पारगांव, चिखलहोळ अशीं तीन गांवें आहेत.

**वाड्या**—औंध गांवाखालीं गोसाव्याची वाडी व करंड्याची वाडी अशा दोन वाड्या आहेत.

**क्षेत्रफळ**—१६·६ चौरस मैल आहे. लोकसंख्या ४४२० व वसूल सन १८९५।९६ इ. सालीं सर्वे मोजणी जाहल्याप्रमाणें इनामदाराचा वसूल वजा जातां, ६३०० रुपये आहे.

## ठाणें किन्हई

ह्या तालुक्यांत किन्हई हा एकच गांव आहे. तो कोरेगांव तालु-

क्यांत आहे. याचें क्षेत्रफळ ७·५ चौरस मैल असून लोकसंख्या १३३७ व सन १८९५।९६ इ. सालीं रिव्हिजन सर्वे जाहल्याप्रमाणें इनामदार वजा जातां वसूल रुपये ५००० आहे.

**वाड्या**—किन्हई गांवाखालीं ढेमन्याची वाडी, मध्वापूर अथवा बलभीमबुवाची वाडी व गणेशवाडी अशा तीन वाडया आहेत.

## ठाणें संगममाहुली

संगममाहुली हा गांव सातारा तालुक्यांत आहे. हा गांव सातारा शहरचे पूर्वेस तीन मैलांवर श्रीकृष्णा व वेण्णा या दोन नद्यांचे संगमावर आहे. या गांवीं गांवठाणाचे बाहेर संस्थानिकांचा अम्मल नाहीं. गांवठाणची जमीन ४७ एकर आहे. लोकसंख्या ९२७ आहे. किरकोळ बाबींचें उत्पन्न रुपये २०० आहे.

## तालुका कुंडल

**सीमा**—उत्तरेस खानापूर तालुका, पूर्वेस व दक्षिणेस तासगांव तालुका, पश्चिमेस वाळवे तालुका.

**क्षेत्रफळ**—५७·२ चौरसमैल असून लोकसंख्या १७,३२० आहे.

**वसूल**—इनामदाराचा वसूल वजा जातां रुपये ७०,००० आहे. तो सन १८९५।९६ इ. सालीं सर्वे मोजणी झाल्याप्रमाणें आहे.

**गांवें**—कुंडल, कोडोली, आळसंद, कापील, दुशेरे, व्याहापूर,

मनु, गोंदी, रामापूर, कोर्टी, बिचूद, विरवडे, शिरसगांव, वेलवडे, पाडळी, घोणशी, सोनकिरे, सैदापूर अशीं अठरा गांवें आहेत.

**वाड्या**—कुंडल गांवाखालीं किर्लोस्करवाडी, व्याहापूर गांवाखालीं रेणुशाची वाडी, कोर्टी गांवाखालीं भोसल्याची वाडी, याप्रमाणें तीन वाड्या आहेत.

## तालुका गुणदाळ

गुणदाळपासून सुमारें २० मैलांवर पांच गांवांचा कोऱ्याळ ह्मणून तालुका वेगळा होता तो गुणदाळ तालुक्यांत सामील केला आहे.

**सीमा**—गुणदाळ तालुक्याचे उत्तरेस व पूर्वेस विजापूर तालुका, दक्षिणेस व पश्चिमेस बागलकोट तालुका व जमखिंडी संस्थानची हद्द. कोऱ्याळ तालुक्याचे पूर्वेस व उत्तरेस विजापूर तालुका, दक्षिणेस कुरुंदवाड व जमखिंडी संस्थानची हद्द, पश्चिमेस जत संस्थानची हद्द.

या तालुक्याचें क्षेत्रफळ ८०·१ चौरस मैल व लोकसंख्या ८,३५४ आहे. इ. स. १८९४–९५ इ. सालीं सर्वे मोजणी होऊन तरम लागूं झाल्याप्रमाणें इनामदार, जहागिरदार यांचा वसूल वजा जातां बाकी रुपये ४०,००० आहे.

**गांवें**—कोऱ्याळ, हंगरगी, सीरबूर, बोवलाद, होसूर, धनर्गी, केंगलगुत्ती, लोहगांव, कणबूर, गुणदाळ, जमगी, टकलगी, बोळ-

चिकलगी, नंद्याळ, गलगले, हुवनूर, काळीवत ( उजाड ), येणें-प्रमाणें १७ गांवें आहेत.

## तालुका आटपाडी

**सीमा**—उत्तरेस माण तालुका, पूर्वेस सांगोले तालुका, पश्चिमेस खटाव तालुक्याचा व खानापूर तालुक्याचा कांहीं भाग, दक्षिणेस खानापूर तालुका.

ह्या तालुक्यांत ३२ गांवें व ४७ वाड्या आहेत. क्षेत्रफळ ३३७·१ चौरस मैल व लोकसंख्या ३६,२२७ आहे. वसूल रिव्हिजन सर्व्हेच्या तरमाप्रमाणें इनामदारांचा वसूल वजा जातां रुपये ८२,००० आहे.

**गांवें** ( ३२ )—आटपाडी, दिघंची, शेटफळ, नेलकर्जी, निंबवडे, माडगुळे, झरे, करगणी, विठलापूर, घरनिकी, पिंप्री बुद्रुक, राजेवाडी, वलवण, पिंप्री खुर्द, जांभुळणी, घाणंद, खरसुंडी, चिंचाळे, कामत, त्रोंबेवाडी, बनपुरी, पळसखेल, गळवेवाडी, कौठुळी, आवळाई, विभूतवाडी, तडवळे, हिवतड, गोमेवाडी, लिंगीवरे, उंबरगांव व शेरेवाडी.

**वाड्या** ( ४७ )—

१३ कसबे आटपाडी गांवाखालीं—

२ पुजार वाड्या, २ चौगुल्याच्या वाड्या, १ देशमुखवाडी, १ खाजोळ्याची वाडी, १ यमाजी पाटलाची वाडी, १ मासाळ वाडी, १ शेडग्याची वाडी, १ मुढ्याची वाडी, १ गोरडवाडी, १ तळेवाडी, १ भिंगेमळा.

१ माडगुळ्याखालीं—लेंगरेवाडी.

१ शेटफळ गांवाखालीं—पात्र्याची वाडी.

६ नेलकर्जी गांवाखालीं—आवट्याची, धावड्याची. घुल्याची. कान कात्र्याची, मेटकऱ्याची वाडी, माल्याची वाडी.

२ मौजे वलवण गांवाखालीं—कारंडयाची व पुकळ्याची वाडी.

१ मौजे घरनिकी गांवाखालीं—बेलगरवाडी.

२ पिंप्री बुद्रुक गांवाखालीं—पडळकराची वाडी व तरसवाडी.

२ मौजे झरे गांवाखालीं—पारेकराची वाडी, कुरुंदवाडी.

२ निंबवडे गांवाखालीं—वाकाशाची व अनुशाची वाडी.

१ पिंपरी खुर्द—पुजारवाडी.

१ पळसखेल—कुचेकराची वाडी.

१ बनपुरी—मिटकीची वाडी.

२ गोमेवाडी गांवाखालीं—अर्जुनवाडी व वाघमोडयाची वाडी.

१ हिवतड—माळ्याची वाडी.

१ आवळाई—पिशाची वाडी.

२ विभुतवाडी गांवाखालीं—घुल्याची वाडी, तरसवाडी.

१ लिंगवरे—महाडकाची वाडी.

२ उंबरगांवाखालीं—धडसाची वाडी, ठोंबऱ्याची वाडी.

५ करगणी गांवाखालीं—तळेवाडी, वाळेवाडी, माळेवाडी, सात-पुत्याची वाडी, चिंचघाटची वाडी.

येणेंप्रमाणें वाडया व गांवें आहेत.

---

**टीप**—औंध संस्थानचा तपशीलवार माहितीचा स्वतंत्र भूगोल छापलेला आहे. जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांत मिळेल.

# सातारच्या छत्रपतींचे प्रतिनिधी

१ प्रल्हाद निराजी इ. स. १६९० ते १६९३

२ तिमाजी रघुनाथ हणमंते इ. स. १६९७

३ गदाधर प्रल्हाद १७०८

४ नारो प्रल्हाद

५ परशुराम त्रिंबक

# परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांची वंशावळ

## यमाजीपंत कुळकर्णी, किन्हईकर

- नागोजी
  - 0
- कृष्णराव
  - आप्पाजीपंत
    - 0
  - त्रिंबकपंत
    - परशुरामपंत
      - **परशुरामपंत** ( १६९९ ते १७१८ )
        जन्म इ. सन १६६० | मृत्यु ता० २७।५।१७१८
        - कृष्णाजीपंत (मूळ पु. सं. विशाळगड)
        - त्र्यंबकराव
          - 0
        - श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव
          ता० ८ जून १७१८ ते १७४६
        - सदाशिवराव
          - 0
        - जगज्जीवनराव
          १७४६ ते १७५४
          - 0
    - माधवराव
      - 0

- गंगाधरराव
  - श्रीनिवासराव ऊर्फ भवानराव (१७५४ ते १७७७)
    - परशुरामराव ( ऊर्फ थोटेपंत ) (१७७७ ते १८४८)
      - श्रीनिवासराव (११।६।४८ ते २७।९।१९०१)
        - परशुरामराव (२०।२।१९०१ ते २७।८।१९०५)
          - गोपाळकृष्णराव ऊर्फ नानासाहेब (३।११।१९०५ ते १२।९।१९०७)
          - विठ्ठलराव
        - गंगाधरराव
          - श्रीनिवासराव
        - भवानराव ऊर्फ बाळासाहेब (ता० ४।११।१९०९ अधिकार मिळाला.)
          - त्रिंबकराव ऊर्फ राजेसाहेब
          - परशुरामराव ऊर्फ आप्पासाहेब
        - भगवंतराव
          - 0

# प्रतिनिधी घराण्याचा इतिहास

## श्रीमंत परशुराम त्रिंबक प्रतिनिधी

### भाग १ ला.

तापी व तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधील प्रदेशास पूर्वी महाराष्ट्र अशी संज्ञा होती. अर्थात् त्या राष्ट्रांत–प्रदेशांत राहणारे लोक आपणांस महाराष्ट्रीय असें ह्मणवूं लागले. महाराष्ट्र या शब्दाचा अपभ्रंश होऊन परंपरेनें महारठ–मऱ्हाट–मराठा असें रूप झालें आहे.

इ. स. चे चवदावे शतकापासून सतराव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत महाराष्ट्र देश मुसलमानी अमलाखालीं होता. परंतु, मुसलमान लोकांच्या ऐषआरामी वागणुकीमुळें त्यांच्या अंगचें नैसर्गिक तेज हळूं हळूं मावळत जाऊन महंमदी धर्माविषयीं दुरभिमान मात्र त्यांचे ठिकाणीं वळावत चालला होता. हिंदुधर्माचा नायनाट करून सर्वत्र यावनी धर्म करून टाकण्याचें अमानुष व दुष्टपणाचें कृत्य त्यांनीं सुरू केलें. धर्मवेडाच्या भरांत त्यांनीं देवांच्या मूर्ति फोडिल्या, सुंता करून कित्येक हिंदूंना जुलमानें यवन बनविलें, जिझिया कर बसविला, हिंदूंचीं राज्यें धुळीस मिळविण्याचा सपाटा चालविला, स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग करण्याचें राक्षसी कृत्य करण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. हिंदूंच्या असंख्य धर्मपुस्तकांची त्यांनीं जाळून राखरांगोळी

केली. अशा आणीबाणीच्या काळांतहि ईशकृपेनें महाराष्ट्रांत जी अस्सल मराठ्यांचीं घराणीं नांदत होतीं त्यांचा मात्र स्वाभिमान जागृत होता. मोरे, निंबाळकर, शिर्के, घाडगे, माने, डफळे, माहाडिक, भोसले वगैरे घराण्यांतील पुरुषांनीं आदिलशाहींत व निजामशाहींत मोठमोठीं महत्वाचीं कामें केलीं होतीं. शिवाय, महाराष्ट्राची नैसर्गिक देशस्थिति, मराठ्यांचा मानी स्वभाव व त्यांची ग्रामसंस्था याहि गोष्टी मुसलमानी अमलांत मराठ्यांचें महत्व कायम राखण्यास कारणीभूत झाल्या होत्या.

हिंदुधर्माचा अत्यंत छल करून मुसलमानांनीं यावनी धर्माचा प्रसार करण्याचे कामास सुरवात केल्यामुळें, हिंदुसमाजांत अतिशय चीड उत्पन्न होऊन त्या संकटाचा परिहार करण्याकडे साहजिकच हिंदु लोकांचें मन वेधलें. आणि अशा प्रसंगीं त्यांस सहाय्य करणारे, साधुसंतहि त्या काळीं निर्माण झाले व त्यांनीं धर्मोन्नतीचें काम हातीं घेतलें. धर्मोन्नति ही राष्ट्रोन्नतीची जननी होय. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम या संतमंडळींनीं धर्मजागृति करण्याचे कामीं जे कष्ट केले ते ऐतिहासिक दृष्ट्या फारच महत्वाचे आहेत. या सर्व संतमंडळींत श्रीसमर्थ रामदासांची कामगिरी फारच महत्वाची होती. धर्मसंबंधानें लोकांत उत्पन्न झालेल्या चळवळीचा उपयोग राष्ट्रकार्याकडे कसा करावा, हें हिंदुसमाजास रामदासांनीं दाखविलें. आपल्या अंगीं असलेल्या क्षात्रतेजाचा राष्ट्रकार्याकडे जुटीनें उपयोग केला तर आपल्यास लवकरच ऊर्जितावस्था प्राप्त होईल, इत्यादि गोष्टी त्या वेळेच्या मराठे मंडळाच्या मनांत रामदासांनीं भरवून दिल्या. त्यांनीं साधुवृत्तीनें फिरून महाराष्ट्रांत मुसलमानी अम-

त्याची कोठें कशी स्थिति आहे याची मराठे मंडळास चांगली ओळख करून दिली. मुसलमानांचे अंतःकलह, त्यांची अव्यवस्था, हिंदूंचा छल झाल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली चीड आणि संतमंडळीनें धर्मोन्नतीच्या जोरावर लोकांचे अंगीं उत्पन्न केलेला स्वाभिमान ह्या गोष्टीं-मुळें मुसलमानी अमलाचा प्रतिकार करून स्वराज्यस्थापनेच्या उद्योगास मराठे लागले व श्रीशिवछत्रपतीसारखा पराक्रमी पुरुष त्यांस पुढारी मिळतांच त्यांचें तें काम विशेष जोरास लागलें.

श्रीशिवछत्रपतींचे पूर्वज हे इकडे फार काल नांदत असलेल्या अस्सल मराठे क्षत्रियकुलांपैकीं होते. ते दौंडाजवळ हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे ठिकाणच्या पाटिलक्या करून राहात असत. पुढें त्यांनीं दौलताबादेजवळ वेरुळगांवची पाटिलकी संपादन केली. या पूर्वजांपैकीं बाबाजी नांवाचे पुरुषास मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते. मालोजीनें प्रथम लखूजी जाधव शिंदखेडकर याचे पदरीं निजामशाहींत नोकरी धरली. त्यांस शहाजी व सरिफजी असे दोन पुत्र झाले. शाहाजीस लखूजी जाधवाची मुलगी जिजाबाई ही दिली होती. तिच्या पोटीं शके १५४९ प्रभव संवत्सरीं वैशाख शु॥ २ सोमवारीं रोहिणी नक्षत्रावर, मराठी राज्याचा संस्थापक, शिवाजी हा पुणें प्रांतांत शिवनेरी किल्ल्यांत जन्मास आला.

शिवाजीचें लहानपणचें शिक्षण जिजाबाई साहेब व पुणें प्रांताचा शाहाजीचा कारभारी दादाजी कोंडदेव यांच्या देखरेखीखालीं झालें. पुढें मावळप्रांतांतील मावळे शूर व इमानी आहेत, अशी शिवाजीची खात्री झाल्यामुळें त्यांना शिपाईगिरींत तयार करून त्यांचे जोरावर त्यानें मराठी

राज्याचा पाया घातला. त्यानें विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें व मोंगल यांच्यावर स्वाऱ्या करून बराच मुलूख संपादन केला; आणि त्यांच्या राज्यांत आपले चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बसविले. आपण मुसलमानांचे अंकित नसून स्वतंत्र व सत्ताधीश आहों, असें जाहीर व्हावें ह्मणून शके १५९६ जेष्ट शुद्ध १३ रोजीं त्यानें आपणास विधिपूर्वक राज्याभिषेक करविला. हा पराक्रमी पुरुष शके १६०२ चैत्र शुद्ध पौर्णिमा शनिवार रोजीं रायगडीं मरण पावला. श्रीशिवछत्रपतींचे पश्चात् त्यांचे पुत्र संभाजी महाराज हे राज्यपदारूढ झाले. हे स्वभावानें क्रूर व तामसी असल्यामुळें त्यांनीं शिवाजी महाराजांच्या वेळचे कित्येक मोठमोठे नामांकित सरदार व मुत्सद्दी यांचा नाश केला. तेव्हां शिवछत्रपतीनें लाविलेला मराठ्यांचा राज्यवृक्ष जीवनाभावामुळें कोमेजत चालला. मराठे लोकांत फाटाफूट होऊन सर्व आपआपल्या ठिकाणीं राहूं लागले. अशी संधी मिळतांच औरंगजेबानें शेख निजाम ऊर्फ मुकरबखाननामक सरदाराकडून संभाजी महाराजांना त्यांच्या कलुशा नामक कारभाऱ्यासुद्धां धरून नेलें; व शके १६१० फाल्गुन वद्य ३० सोमवार रोजीं तुळापूर मुक्कामीं क्रूरपणानें त्यांचा शिरच्छेद करविला. संभाजी महाराजांचा औरंगजेबानें अशा रीतीनें वध केल्यामुळें मराठ्यांना अतिशय त्वेष आला; आणि त्यांनीं मसलत करून संभाजी महाराजांचे पुत्र शिवाजी हे वयानें लहान असल्यामुळें ते प्रौढ होईतोंपर्यंत त्यांच्या मातोश्री येसूबाई साहेब यांच्या संमतीनें, संभाजी महाराज यांचे धाकटे बंधु राजाराम महाराज यास आपला मुख्य करून ते शत्रूच्या नाशाविषयीं उद्योग करूं लागले. त्यांत प्रल्हाद

६६२५

निराजी, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, रामचंद्रपंत बावडेकर, परशुराम त्रिंबक, जनार्दनपंत हणमंते, खंडो बल्लाळ चिटणीस, निंबाळकर, मोरे, मोहिते, घाटगे वगैरे सरदारांनीं असा विचार केला कीं, औरंगजेब दिल्लीपती लाखो फौजेनिशीं स्वत: मराठेशाही बुडविण्यास तयार झाला आहे, त्याअर्थीं एके ठिकाणीं सर्वत्रांनीं बसून निभाव लागावयाचा नाहीं. सबब येसूबाई साहेब व धाकटे शिवाजी यांना बंदोबस्तानें रायगडीं ठेवावें आणि राजाराम महाराजांना बरोबर घेऊन आपण सर्वांनीं पन्हाळगड, विशाळगड वगैरे किल्ल्यांचें आश्रयानें रहावें; ह्मणजे आपल्यामागें मोंगल सैन्य येऊन येसूबाई साहेब यांना त्रास व्हावयाचा नाहीं. या विचारास अनुसरून सर्व सरदारांनीं रायगडचा बंदोबस्त केला आणि आपण राजाराम महाराजांसह बाहेर पडले. देशाचा व फौजेचा बंदोबस्त करीत ते पन्हाळ्याकडील भागास गेले आणि फौजेची जमवाजमव करून तुळापुरीं औरंगजेबाचे छावणीवर हल्ला करण्यासाठीं संताजी घोरपडे याची त्यांनीं रवानगी केली. स्वत: राजाराम महाराज आपल्या सरदारांसह खासा औरंगजेबावर चालून गेले व त्यांनीं गनिमी काव्यानें त्यांस जेरीस आणून सोडलें. इकडे हा प्रकार चालला आहे तों पूर्वींच औरंगजेब बादशाहानें झुलपिकारखानास रायगड किल्ला सर करण्यासाठीं रवाना केल्याप्रमाणें त्यानें रायगडास वेढा देऊन मोर्चेबंदी केली. रायगड किल्ला आधींच बळकट आणि त्यांत विपुल अन्नसामुग्री व फौजेची उत्तम व्यवस्था असल्यामुळें किल्ला सर होण्याविषयीं झुलपिकारखानाचे जितके प्रयत्न होणें शक्य होते तितके झाले, तथापि किल्ला सर झाला नाहीं. पण

मराठ्यांच्या दुर्दैवानें सूर्याजी पिसाळासारख्या निमकहराम मनुष्यास वांईच्या देशमुखीचा लोभ उत्पन्न होऊन किल्ल्याच्या चोरवाटा त्यानें शत्रूस दाखविल्या आणि किल्ला झुलपिकारखानास सर करून दिला. झुलपिकारखानाचें 'आपणांस यत्किंचितहि अपाय होणार नाहीं' असें वचन घेऊन येसूबाई साहेब मुलासुद्धां त्याच्या स्वाधीन झाल्या. खानानें उभयतांस बादशाहाचे स्वाधीन केल्यावर येसूबाई साहेबास व शिवाजीस जीवापलीकडे जपणारी बादशाहाची मुलगी झेबुतुनिसा ही परमेश्वरकृपेनें मिळाल्यामुळें त्यांना अन्नानें व सुखानें रहातां आलें. सूर्याजी पिसाळाचे फितुरीमुळें येसूबाई साहेबास मुलासुद्धां औरंगजेबाचे ताब्यांत जाणें भाग पडलें. हा मराठेशाहीचा अपमान पन्हाळगडीं राजारामप्रभृति मंडळींच्या कानावर जाऊन त्यांना अत्यंत वाईट वाटलें व मराठेंशाहीचें संरक्षण कसें होईल ह्याची मोठी काळजी पडली.

श्री शिवछत्रपतींनीं मराठी साम्राज्यास विजापूर, गोवळकोंडा या मुसलमान राज्यांपासून त्रास पोंचणार नाहीं, असा बंदोबस्त केला होता. फक्त मोंगल बादशाहीविषयीं त्यांचे मनांत काळजी होती. दिल्लीपतीची शक्ति कितपत आहे याचा अदमास घेण्यासाठीं आग्र्यास स्वतः जाऊन तेथें हाल सोसून व अपमान साहून छत्रपतींनीं आपला आंवाका अजमावून पाहिला, आणि हिंदुस्थानांतून दक्षिणेंत परत आल्यावर इकडील प्रांताचा बंदोबस्त केला. राष्ट्रावर संकट आलें असतां बचावासाठीं, कर्नाटकांत स्वारी करून, विजापूरकरांच्या मांडलिकपणांतून व्यंकोजी राजे यांना सोडवून आणिलें व आपलें वर्चस्व त्याचेकडून कबूल करविलें. शिवाय, मराठी राष्ट्रवृक्षावर मों-

गल बादशहाची कुऱ्हाड आल्यास संरक्षणासाठीं मुलूख स्वतंत्र केला आणि जिंजीच्या किल्ल्यावर फौजेचाहि बंदोबस्त केला व रघुनाथ नारायण हणमंते आणि हंबीरराव मोहिते हे विश्वासू व शूर नोकर नेमण्यांत आले. या दूरवर दृष्टीनें तयार केलेल्या श्रीशिवछत्रपतींच्या योजनेकडे राजारामप्रभृति मंडळींचें लक्ष लागून तिकडे जाण्याचा बेत ठरला. महाराष्ट्राचा व कर्नाटकांतील राज्याचा बंदोवस्त होई-पर्यंत औरंगजेबास अडवून धरण्यासाठीं रामचंद्रपंत अमात्य यांस 'हुकमतपन्हा' असा किताब देऊन त्यांचे हाताखालीं परशुराम त्रिंबक यांस सरदारीचीं वस्त्रें देऊन बंदोबस्तासाठीं नेमिलें. जिंजीस पोंच-ल्यावर प्रथम राज्यव्यवस्थेचें काम राजारामानें आपल्या हातीं घेतलें. राज्याचा खरा मालक शाहू. तो औरंगजेबाच्या कैदेंत होता. तथापि, त्या योगानें मराठ्यांची सत्ता खालावली नाहीं. दुसरा धनी राज्यास होऊन सर्व व्यवस्था पूर्ववत् किंबहुना जास्त जोरानें चालू आहे, असें शत्रूस भासविणें अत्यंत जरूर होतें. संभाजी किंवा शाहू यांवांचून राज्य अडून राहात नाहीं, हें बादशहास कळविल्यानें त्याचे हातपाय बरेच मोडल्यासारखे होतील. भपका दाखविल्याशिवाय दरारा बसत नाहीं, ही गोष्ट राज्यक्रांति व युद्ध यांच्या इतिहासांतहि पर्यायानें नेहमीं दृष्टीस पडते. ह्मणून राजाराम व त्याचे मसलतगार यांनीं जिंजीस पुनः राज्याची उभारणी केली. राजारामानें छत्रपतिपदाचा औप-चारिक रीत्या स्वीकार केला. ह्मणजे सिंहासनावर न बसतां गादीवर बसूं लागला.

मराठीराज्याचे बचावासाठीं पूर्वीचे अष्टप्रधानादिक येऊन ते आपा-पल्या पदावर रुजू झाले. यामुळें प्रल्हाद निराजी यांना पद देण्यास

शिलक राहिलें नाहीं. प्रल्हादपंत हे शहाणे व सर्व मसलतीचे आधारस्तंभ, यांना देण्यास योग्य असें पद कोणतें योजावें असा राजाराम महाराजांस मोठा विचार पडला. शिवाजी महाराजांचे न्यायाधीश निराजी रावजी यांचे प्रल्हादपंत हे चिरंजीव. यांची महाराजातर्फे गोवळकोंडें येथील बादशाहाचे दरबारांत वकिलीचे जागीं नेमणूक झाली होती. हे अत्यंत स्वामिनिष्ठ, राजकारणकुशल व बुद्धिमान् होते. शिवाय, याच प्रल्हादपंतांनीं चंदीचे मुक्कामीं महाराष्ट्रराज्यरक्षणाचे कामीं अप्रतिम सहाय्य केलें. हें जाणून अष्टप्रधानापेक्षांहि श्रेष्ठ असें "प्रतिनिधी" (आपलीच प्रतिमा) हें पद जोडून तें राजाराम महाराजांनीं चंदी मुक्कामीं शके १६१४ इ. सन १६९२ त प्रल्हादपंतांस दिलें. प्रतिनिधींचा अधिकार सर्व प्रधानावर चालत असे. राजपत्रावर मुख्य प्रधानाचे उजवे बाजूस प्रतिनिधींचे शिक्के होत असत. त्यांना सालीना १५००० होन नेमणूक मिळत असे. प्रतिनिधीस वस्त्रें द्यावयाचीं तीं खुद्द छत्रपति देत व प्रधानास प्रतिनिधींच्या हस्तें तीं मिळत असत. प्रल्हाद निराजी हे प्रतिनिधी झाल्यावर त्यांनीं आपला अष्टपैलु शिक्का तयार करून त्यांत पुढें लिहिलेलीं अक्षरें कोरलीं ॥ श्रीलक्ष्मीनृहरिप्रीतेः मुद्रा नीराजिजन्मनः ॥ राजारामप्रतिनिधेः प्रल्हादस्य विराजते ॥ ह्यावरून राजाराम महाराजांचे कारकीर्दींतच "प्रतिनिधी" *पद निर्माण झालें हें उघड आहे.

---

* प्रतिनिधीपदासंबंधानें एका जुन्या बखरींत निराळाच वृत्तांत उपलब्ध आहे. ज्या वेळीं श्रीशिवछत्रपतींनीं कर्नाटकांत तंजावर प्रांतीं

श्रीशिवछत्रपतींचे वेळीं राज्यव्यवस्था कशा प्रकारची होती याचा थोडासा खुलासा करतों. छत्रपतींनीं खालीं दिलेल्या ८ तत्वांवर राज्य व्यवस्थेची इमारत रचली होती.

१ ज्या डोंगरी किल्ल्यांचे सहायानें छत्रपतींनीं स्वराज्याचा पाया घातला त्यांस त्यांनीं दिलेलें महत्व.

---

स्वारी केली त्या वेळीं तंजावरचे राजे व्यंकोजी यांचा व शिवाजी महाराजांचा वडिलार्जित संपत्तीचे वांटणीबद्दल थोडासा कलह झाला. इतकेंच नव्हे तर, शिवाजी महाराज व व्यंकोजी राजे यांच्या परस्पर भेटी झाल्या त्या वेळीं व्यंकोजी राजे यांनीं शिवाजी महाराजांशीं सौजन्याचें वर्तन न करितां त्यांचा अपमानच केला. यामुळें शिवाजी महाराजांस क्रोध येऊन त्यांनीं व्यंकोजी राजे यांस कैद करावी अशी आज्ञा केली. त्या वेळीं ह्या प्रांताचे पूर्ण माहितगार रघुनाथ नारायण हणमंते व प्रल्हाद निराजी हे दोन शहाणे मुत्सद्दी महाराजांजवळ होते. त्यांना ही गोष्ट समजतांच फार वाईट वाटलें व काळजी उत्पन्न झाली. शिवाजी महाराजांनीं व्यंकोजी राजे यांस खरोखरच कैद केले तर महाराजांच्या धवल कीर्तीला विनाकारण कलंक लागेल; करितां ही गोष्ट अमलांत येऊं देणें इष्ट नाहीं, असा उभयतांचा विचार ठरला. परंतु, महाराजांच्या आज्ञेचा भंग करण्याची उभयतांचीहि प्राज्ञा नव्हती. यामुळें प्रल्हादपंतांनीं निराळेंच एक गुप्त राजकारस्थान करून आपला हेतु सिद्धीस नेला. तो असा,—प्रल्हादपंत हे व्यंकोजी राजे यांचा वेश घेऊन मेण्यांत बसून

२ राज्यांतील बडेबडे अधिकार एकाच घराण्यांत वंशपरंरेनें न देण्याविषयींचा निर्बंध.

३ लष्करी किंवा मुलकी कामगिरीबद्दल कोणासहि जमीन अगर जाहागिर तोडून देण्याची बंदी.

४ जमीन महसुलाचें काम जमिनदाराकडून न करतां सरकारी कामगाराकडे देण्याची वहिवाट.

---

शिवाजी महाराजांच्या लोकांबरोबर त्यांच्या लष्करांत आले व तेथेंच आपण व्यंकोजी राजे ह्मणून सारी रात्र मुक्काम केला. दरम्यान रघुनाथ नारायण हणमंते यांनीं महाराजांची क्रुद्ध मुद्रा थोडी शांत झालेली पाहून व्यंकोजीस कैदेंत ठेवणें, हें महाराजाचें थोरपणास कमीपणाचें आहे, अशी महाराजांची खात्री केली. तेव्हां महाराजांनीं व्यंकोजी राजे यांस तावडतोब आपल्या डेऱ्यांत घेऊन येण्याची आज्ञा केली; व निरोपाचीं वस्त्रें मागितलीं. महाराजांचें बोलावणें येतांच प्रल्हाद निराजींना आपण व्यंकोजी राजे ह्मणून महाराजांसमोर जाण्याची मोठी पंचाईत पडली. तथापि, ते मोठे चतुर व राजकारणांत मुरलेले होते; शिवाय रघुनाथ नारायण हणमंते हे त्यांस पूर्ण सहायकारी होते. यामुळें मोठ्या सावधगिरीनें प्रल्हादपंत महाराजांजवळ येऊन दाखल झाले. शिवाजी महाराजांची, आपण कैद केलेले व्यंकोजी राजे आपणासमोर येत आहेत, अशीच कल्पना होती. पण व्यंकोजीच्या वेषांत प्रल्हादपंत आलेले पाहतांच महाराज आश्चर्य चकित झाले. इतक्यांत रघुनाथ नारायण हणमंते यांनीं पुढें होऊन हात जोडून विनंती केली कीं, महाराज ! व्यंकोजी राजे सरकारापुढें येण्यास लाचार आहेत. त्यांचे प्रतिनिधी आज्ञेप्रमाणें महाराजांपुढें हजर आहेत. तेव्हां

५ मक्तयानें वसूल घेण्याची बंदी.

६ अष्टप्रधानांची नेमणूक व त्यांच्यामध्यें राज्यकारभाराची वांटणी.

७ इतर खात्यांस लष्करी खात्याप्रमाणेंच दिलेलें महत्व.

८ परस्परांवर एकमेकांचा दाब रहावा ह्मणून ब्राह्मण, कायस्थ-प्रभु व मराठे या तिन्ही जातींकडे राज्यांतील लहान मोठीं कामें सोंपविण्याबद्दल केलेली व्यवस्था.

---

महाराजांनीं त्यांस प्रश्न केला कीं, व्यंकोजी राजे कैदच झालेले नाहींत कीं काय ! रघुनाथपंतांनीं स्मित करून सांगितलें कीं, महाराज ! सरकारच्या बंधुप्रेमास अपकीर्तीचा निष्कारण कलंक लागूं नये ह्मणून प्रल्हादपंतांनीं व्यंकोजी राजे यांचे वतीनें ही कैद स्वीकारली व सांप्रत त्यांचे प्रतिनिधी ह्मणून सरकारचरणाजवळ ते हजर झाले आहेत. हें ऐकतांच महाराजांना या उभयता मुत्सद्यांचें कारस्थानकौशल्य पाहून मोठें कौतुक वाटलें आणि मोठ्या प्रेमानें प्रल्हादपंतांकडे पाहून ते ह्मणाले ; प्रल्हादपंत, तुह्मी व्यंकोजी राजाचेच काय पण आमचे देखील 'प्रतिनिधी' होण्यास पूर्ण पात्र आहां ! तुह्मी 'प्रतिनिधी' पद धारण केलें ह्मणूनच आमचा नांवलौकिक कायम राहिला. धन्य तुमची ! आजपासून आह्मीही तुह्मांस प्रतिनिधी असेंच ह्मणतों ह्या हकिकतीवरून श्री शिवछत्रपतींच्याच कारकिर्दींत प्रतिनिधी पद निर्माण झालें असावें, असें वाटण्याचा संभव आहे. परंतु, प्रतिनिधी यांना मुद्रा अगर कोणत्याच प्रकारचा अंमल त्या वेळीं न ठरल्यामुळें प्रतिनिधी पदाची साधिकार योजना राजाराम महाराजांचे कारकीर्दींतच झाली, हेंच ह्मणणें सयुक्तिक दिसतें.

यांप्रमाणें राज्यकारभाराचे आठ विभाग करून प्रत्येक विभागावर योग्य अशा एकेक प्रधानाची योजना छत्रपतींनीं केली होती.

| फारशी नांव. | मराठी नांव. | कर्तव्य. |
|---|---|---|
| १ पेशवा | मुख्य प्रधान | मुख्य दिवाणगिरी. |
| २ मुजुमदार | पंतअमात्य | मुलकी हिशेब व वसूल. |
| ३ सुरनीस | पंतसचीव | राज्याच्या दप्तराचा सांभाळ. |
| ४ वाकनीस | मंत्री | राजाचा खासगी कारभार पाहणें. |
| ५ डबीर | सुमंत | परराज्याशीं पत्रव्यवहार ठेवणें. |
| ६ सरनोबत | सेनापती | फौज व आरमाराचा बंदोबस्त ठेवणें. |
| ७ न्यायाधीश | न्यायाधीश | सर्व गुन्ह्यांच्या चौकशी. |
| ८ पंडितराव | पंडितराव | धर्मखात्याचें मुख्य काम. |

यांप्रमाणें नेमलेल्या प्रधान मंडळावर सर्व राज्याची जोखीम सोंपविली होती. हल्लींचे गव्हर्नर जनरल व त्यांचे व कौन्सिलर यांप्रमाणेंच ही व्यवस्था केली होती. पण त्यांत विशेष हें कीं, शिवाजीचे कौन्सिलर ( अष्टप्रधान ) आपापलीं कामें सांभाळून प्रसंग पडल्यास ( शेवटचे २ खेरीज करून ) सर्व प्रधान रणसंग्रामांत तलवारबहादरीचींहि कामें करीत असत.

# परशुराम त्र्यंबकाच्या पूर्वजांची व त्यांच्या जन्माची हकिकत.


## भाग २ रा.

सातारा प्रांतीं वर्धनगडानजीक किन्हई ह्मणून गांव आहे. तेथें यमाजीपंत या नांवाचा, कुळकर्णीवृत्तीवर उदरनिर्वाह करणारा, कुलशीलवान, पण गरीब स्थितींत राहणारा, यजुर्वेदी, सावर्णिस गोत्री ब्राह्मण राहत असे. त्याला दोन मुलगे होते. १ ला नागोजी व २ रा कृष्णा. धाकट्या कृष्णाजीपंतास दोन मुलगे होते. थोरले अप्पाजीपंत व धाकटे त्रिंबकपंत. कृष्णाजीपंत हे भगवत्भक्त होते. त्यांची औंध येथील गांवांत श्री यमाई व डोंगरावर श्री मूळपीठदेवी या पुरातन स्थानांवर फार भक्ति होती. तेंच वळण त्यांचे पुत्र त्रिंबकपंत यांनाहि लागलें होतें. त्रिंबकपंत हे आपलें कुळकर्णीवृत्तीचें काम संभाळून दररोज श्री जगदंबेचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करीत नव्हते. अशीं बारा वर्षें कडकडीत तपश्चर्या झाल्यावर श्री जगदंबेच्या कृपेनें त्यांचें कुटुंब लक्ष्मीबाई यांचे उदरीं मार्गशीर्ष वद्य १ शके १५८२ (इ. सन १६६०) रोजीं परशुरामपंत यांचा जन्म झाला. यांचे वेळीं श्रीजगदंबेनें त्रिंबकपंताच्या बहिणीचें रूप घेऊन बाळंतपण केलें अशी आख्यायिका सांगतात. त्रिंबकपंतांनीं आपल्या भक्तीच्या जोरावर श्रीजगदंबेला औंधाहून किन्हईस नेलें. ज्या दिवशीं जगदंबा औंधाहून किन्हईस नेली त्या वेळची वहिवाट म्हणून श्रीची पालखी दर-

साल कार्तिक शुद्ध १५ स किन्हईस जाते. परशुरामपंताच्या पूर्वींचे त्रिंबकपंतास माधवराव ह्मणून चिरंजीव होते, असा कोठें कोठें उल्लेख सांपडतो. परंतु, परशुरामपंताच्या जन्माची जी हकीकत आहे त्यावरून त्रिंबकपंताचे माधवराव हे प्रथम पुत्र नसून दुसरे असावेत असें वाटतें. परशुरामपंतांची लहानपणची हकीकत उपलब्ध नाहीं, परंतु जी थोडीशी प्रसिद्ध आहे त्यावरून हेंच अनुमान काढतां येते. राष्ट्रामध्यें जे थोर पुरुष अवतीर्ण होतात त्यांची बाल्यावस्थेंतील परिस्थिति देखील सूक्ष्म दृष्टीनें पाहण्यासारखी असते. कारण, तिचा कार्यकारणसंबंध कांहीं अंशीं तरी त्या पुरुषाच्या भावी अभ्युदयाशीं जडलेला असतो व त्या योगानें त्याच्या आयुष्यांतील कित्येक महत्वाच्या गोष्टींचा उलगडा होतो. परंतु, प्रस्तुत चरित्रनायकासंबंधानें तशी स्थिति नाहीं. परिस्थितीचें चित्र डोळ्यासमोर ठेऊन जें अनुमान बसवितां येईल तें बसविल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. असो, परशुरामपंतांचा जन्मकाळ ह्मणजे महाराष्ट्र राज्यघटनेचा ऐन मध्यसमय. तेव्हां त्या वेळच्या स्थितीप्रमाणें लेखणी व तलवार या दोहींचाहि उपयोग करण्याची विद्या संपादन करून परशुरामपंतांनीं आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षी केवळ कुळकर्णीवृत्तीवर आपला उदरनिर्वाह होत नाहीं, असें पाहून किन्हईस राहणें सोडून दिलें व ते विशाळगडीं जाऊन निळो सोनदेव अमात्य यांचे पदरीं राहिले. या वेळीं काळ्यावर पांढरें करण्याच्या कसबापेक्षां शूरत्वाची चहा विशेष असे. परशुरामपंत हे दोन्ही कसबांनीं प्रवीण होते. परशुरामपंतांची हुषारी पाहून निळोपंतांनीं त्यांस कारकुनीची नौकरी दिली. निळोपंताचे चिरंजीव रामचंद्रपंत हे परशुरामपंताचे बरोबरीचे

असल्यामुळें उभयतांचा स्नेहसंबंध जास्त जडला. शिवाय रामचंद्रपंत हे श्रीशिवछत्रपतींचे पेशवे मोरोपंत पिंगळे यांचे जांवई असून सातारप्रांतींच राहात असत. परशुरामपंत हे सातार प्रांताचे माहितगार असल्यामुळें रामचंद्रपंतांबरोबर सातारप्रांतीं कारभारी असत. यामुळें उभयतांचा लोभ जडण्यास जास्त कारण झालें. परशुरामपंतांनीं आपलें कारकुनीचें काम संभाळून प्रसंग विशेषीं समशेर गाजविण्याचा प्रसंग आला, त्या वेळीं ती गाजवून नांव मिळविण्यास सुरवात केली. परशुरामपंतांनीं मर्दुमकीचीं काय काय कामें केलीं त्याचा तपशीलवार उल्लेख अद्याप उपलब्ध नाहीं. परंतु, परशुरामपंतांनीं फार शूरत्वाचीं कामें करून एकनिष्ठपणानें राष्ट्रसेवा केलेली आहे. राजाराम महाराज कर्नाटकांत गेले त्या वेळीं परशुरामपंतास रामचंद्रपंत यांचे हाताखालीं सरदारीचीं वस्त्रें देऊन महाराष्ट्राच्या संरक्षणासाठीं शके १६१२ ( इ. सन १६९० ) सालांत ठेविल्याबद्दल मागें उल्लेख केला आहे. सारांश, चरित्रनायकाच्या उत्कर्षास शके १६१२ त प्रारंभ झाला. राजाराम महाराजांनीं चंदीचे मुकामीं राज्यव्यवस्था सुरू करून अष्ट प्रधान कायम केले. जे सरदार राज्याचे उपयोगी पडले त्यांना किताब देऊन वाढविले. त्यांत परशुराम त्रिंबकास "समशेर बहादर शहाजंग" असें पद मिळालें. मराठ्याच्या नवीन राज्यव्यवस्थेंत अनेक विघ्नें आलीं. त्यांतहि कित्येक प्रसंग आणीबाणीचे होते. अशा प्रसंगास इतिहासकारांनीं आघात हें नांव दिलें आहे. श्रीशिवछत्रपतींची स्वारी आग्र्यास गेली तो मराठेशाहीवरील पहिला आघात. संभाजी महाराज राज्य करण्यास नालायक व त्याच वेळेस औरंगजेब

मोंगल बादशाहा मराठ्यांचा समूळ उच्छेद करण्यासाठीं महाराष्ट्रांत येऊन राहिलेला; हा प्रसंग ह्मणजे मराठेशाहीवरील दुसरा आघात होय. या आघातप्रसंगीं "मराठा" या नांवाची सार्थकता, मराठ्यांची स्वदेशप्रीति, त्यांच्या अंगचा राष्ट्रीय जोम, एकराष्ट्रियत्व प्राप्त करून घेण्यास अवश्य लागणारें शौर्यवीर्यादि गुण, स्वदेशसंरक्षणाकरितां सर्वस्वाचाहि त्याग करण्याची बुद्धि व जीविताबद्दल निरपेक्षता इत्यादि मराठ्यांच्या आंगचे अनेक गुण एकसमयावच्छेदेंकरून या आघातामुळें जगाच्या निदर्शनास आले. किंबहुना या आघातामुळेंच "मराठा" या शब्दाचा विलक्षण दरारा त्यांचे शत्रूस वाटूं लागला. या प्रसंगी गुदरलेल्या भयंकर संकटांत एकंदर मराठे वीर एकमतानें व एकजुटीनें वागले. जितकें जितकें संकट भयंकर येत गेलें. तितकें तितकें त्यास तोंड देण्याची अधिक उमेद लोकांचे आंगीं आली. या पराक्रमाचा महाराष्ट्रावर इष्ट परिणाम घडून आल्याशिवाय राहिला नाहीं. संभाजीच्या मृत्यूनें महाराष्ट्राचें नूतन स्थापित स्वातंत्र्य लयास गेलें, असें क्षणभर लोकांस वाटलें. परंतु तेंच स्वातंत्र्य भक्कम पायावर स्थापिलें जाण्यास हाच आघात कारण झाला. सारांश, मराठ्यांच्या इतिहासांतील सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याचा जो महत्वाचा काळ त्यांत परशुरामपंतांची उर्जितावस्था झालेली आहे. यावरून परशुरामपंतांच्या योग्यतेसंबंधानें जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. चंदीचंदावराकडील राज्यकारभार सुरळीत चालून मराठ्यांचा उदय होण्यास महाराष्ट्रांत जबरदस्त कर्तृत्ववान् पुरुषांची जरूरी होती. कारण, महाराष्ट्रांत खासा औरंगजेब लाखो फौजेनिशीं हजर होता, मराठे



नामोहरम करून एकछत्री मुसलमानी राज्य करावयाचें हा ज्यांचा कृतसंकल्प त्यांच्याशीं टक्कर देऊन, राजाराम महाराज आदिकरून मुत्सद्दी मंडळास कर्नाटकांत उपसर्ग न लागावा आणि महाराष्ट्रांतील मोंगल सैन्य मोडून स्वस्थता व्हावी या दुहेरी कामगिरीवर रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक व शंकराजी नारायण यांची योजना झालेली होती. त्यांनीं औरंगजेबाच्या सैन्याची काय स्थिति केली आणि महाराष्ट्राचा बंदोबस्त कसा केला हें बखरकारांच्या शब्दानेंच सांगतों " मराठी फौज वळावत आहे. अकस्मात यावे, बक मच्छ उचलून नेतो तसा घाला घालावा. शिपाईगिरीची शर्थ करावी. प्रसंग पडल्यास माघारी पळून जावें. खाण्यापिण्याचा दरकार बाळगीत नाहींत. पाऊस, ऊन, थंडी व अंधार काहीं न पाहतां घोड्यावरच हरभरे, चटणी, भाकरी, कांदा खाऊन धावतात, त्यांस कसें जिंकावें ? एक मुलुखांत फौज आली म्हणून तिजवर फौजेची रवानगी करावी तों दुसरीकडे जाऊन ठाणीं घेतात; मुलूख मारतात; हे अदमी नव्हत भूतखाना आहे. " हे औरंगजेबाच्या तोंडचे शब्द आहेत; यावरून त्याच्या सैन्याची दशा काय झाली असेल याचें अनुमान होतच आहे. रामचंद्रपंत व परशुरामपंत यांनीं महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा बंदोबस्त उत्तम ठेविला. प्रांतांत स्वस्थता करून सरकारसाऱ्याची पद्धत बांधून दिली. ठिकठिकाणीं नवीन फौजा ठेविल्या. मोंगलांचा उच्छेद व्हावा म्हणून एकसारखा जागृतपणा कायम ठेवून आपल्या मनास तिळभरही विकारवश होऊं न देतां महाराष्ट्रमंडळाच्या सेवेंत त्यांनीं यत्किंचितही

उणें पडूं दिलें नाहीं. याप्रमाणें व्यवस्था ठेविल्यामुळें औरंगजेब बादशाहास महाराष्ट्रांतून लवकरच पाय काढावा लागला.

वांई व मिरज प्रांतांतील मोंगल सरदारांस संताजी घोरपडे यांनीं जेरीस आणल्यामुळें ते आपल्या फौजा घेऊन पन्हाळगडाच्या आश्रयास आले; ही बातमी रामचंद्रपंतांस समजतांच त्यांनीं परशुरामपंतांचे हाताखालीं दहा हजार फौज देऊन त्यांस मोंगलाकडून पन्हाळा घेण्यास पाठविले. शत्रूस ही मराठ्यांची चळवळ समजल्यामुळें किल्ल्याचा बंदोबस्त करून त्यांनींहि लढाईची तयारी चालविली. इतक्यांत परशुरामपंतांनीं किल्ल्यास वेढा घालून तोफ सुरू केली. कित्येक दिवसपर्यंत एकसारखा गोळ्यांचा वर्षाव चालला होता. परंतु, मोंगल दाद देईनात. आधींच किल्ला बळकट, त्यांतून किल्लेदारांस—सर्जेखानास वाई व मिरज येथील सैन्याची मदत मिळाल्यामुळें किल्ला सहज हातीं लागेल असें परशुरामपंतांस वाटेना. तेव्हा परशुरामपंतांनीं मसलत करून उत्तरेच्या बाजूनें किल्ल्यास अकस्मात् शिडी लाविली आणि दोन तीनशें मराठे तटावर चढून जाईपर्यंत शत्रूस कांहींच बातमी लागू दिली नाहीं. पुढें एकदम ‘ हरहर महादेव ! ’ शब्दांचा गजर होऊन बंदुकांची शिलक झडली, तेव्हां मोंगल जागे होऊन पाहतात तों मराठ्यांनीं कित्येक लोक जागच्याजागीं लोळविलेले असून सर्व किल्लाभर मराठे पसरले आहेत. असें पाहतांच दगा ! दगा ! असें म्हणून मोठ्या त्वेषानें ते मराठ्यांवर चालून आले. तेव्हां उभय सैन्यांतील लोकांची कत्तल उडण्यास आरंभ झाला. कांहीं वेळपर्यंत एकसारखी तोडातोड चालली होती. पवार व भोसले हे सरदार

किल्ल्याच्या तटावर विद्युल्लतेसारखे चमकत शत्रूंचीं गर्दनें भराभर उडवीत आहेत तों परशुरामपंतांनीं मोठ्या शहामतीनें किल्लेदार सर्जेखान याजवर आपली तरवार चालवून त्याचा बळी घेतला. आपल्या म्होरप्याची अशी स्थिति झालेली पाहतांच मोंगल सैन्यांत एकच हाहाकार उडाला ! कित्येकांनीं जिवाची पर्वा न धरतां कड्यावरून खालीं धडाधड उड्या घेतल्या व बाकीचे लोक मराठ्यांस शरण आले. अशा रीतीनें शके १६१४ [इ. स. १६९२] या वर्षीं परशुरामपंतांनीं शत्रूंस मराठ्यांचें क्षात्रतेज दाखवून पन्हाळा सर केला.

मोंगल सरदार महाराष्ट्रांत येऊन पुंडावा करूं लागले तेव्हां त्यांजवर १२०० स्वारांनिशीं परशुरामपंतांनीं कलेढोण—मायणी येथें शके १६१६ (इ. स. १६९४) त चाल केली. परंतु सदर प्रसंगीं परशुरामपंतांस मागें फिरावें लागलें. एक महिना मोंगल सरदार मागें लागला होता. अशा रीतीनें पळत असतां तुंग येथें मुक्काम पडला. तुंग गांवाजवळ ब्रह्मनाळ येथें श्री समर्थपंचायतनांतील आनंदमूर्ति यांचे गुरु श्रीरघुनाथस्वामी या सिद्ध पुरुषाची समाधी आहे. परशुरामपंतांचे लष्करांत असलेल्या बावाजी व शिवाजी डफळे या दोघा शिलेदारांचे श्रीरघुनाथस्वामी हे गुरु असल्यामुळें ते उभयतां शिलेदार समाधीचे दर्शनास गेले. तेथून परत येण्यास त्यांस उशीर लागला. परशुरामपंत भोजन करून बसले होते तों डफळे आपल्या गुरूंचें दर्शन करून परत आले. त्यांजला उशिराचें कारण विचारतां, ब्रह्मनाळास आमचे गुरूंची समाधि म्हणजे वृंदावन आहे व तें डोलतें तिकडे गेलों होतों.

वृंदावन डोलतें हें शिलेदारांचें म्हणणें परशुरामपंतांस खरें वाटलें नाहीं; सबब ही गोष्ट प्रत्यक्ष पाहण्यासाठीं दुसरे दिवशीं डफळे यांना घेऊन परशुरामपंत ब्रह्मनाळास गेले. तेथें स्नान करून परशुरामपंतांनीं वृंदावनापुढें कीर्तन केलें. त्या वेळीं शिलेदारांचे सांगण्याप्रमाणें वृंदावन डोललेलें पाहून परशुरामपंतांची त्याविषयीं खात्री झाली. आपणास सिद्ध पुरुषांच्या वृंदावनाचें दर्शन होऊन प्रसादहि झाला; सबब आतां मुक्काम न हालवितां मोंगल सरदारांची शहानिशा पुरवावयाची, असा त्यांनीं मनांत बेत ठरविला. इतक्यांत मोंगल सरदार भिलवडीस आला आहे, असें ऐकतांच त्याजवर चाल करून जाऊन परशुरामपंतांनीं त्याचा पराभव केला; आणि त्याचें सर्व सामान लुटून ब्रह्मनाळास नेलें. ह्या वेळीं रघुनाथस्वामीचे शिष्य आनंदमूर्ति हे सांगलीस होते. त्यांना आणवून त्यांची गांठ घेतली. दोघेहि भगवत्भक्त, मग तो आनंद काय वर्णावा ? आनंदमूर्तींनीं पंतांना आपल्या गुरूंचें प्रत्यक्ष दर्शन करविलें आणि एक कवन करून त्यांत परशुरामपंतांचें नांव घातलें. तें कवन म्हटलें असतां वृंदावनाचा डोल होतो अशी आख्यायिका आहे. परशुरामपंतांनीं कीर्तनसमयीं वृंदावनाचे योग्यतेसंबंधानें श्लोक करून म्हटला तो:—

अचेतना जो बहु डोलवीतो ।
सचेतना काय न बोलवी तो ॥
जो चिद्घनानंद आनंदमूर्ति ।
राहो तदाकार आनंदवृत्ति ॥

आनंदमूर्तींच्या सहाय्यानें व आशीर्वादानें परशुरामपंतांचा इष्ट हेतु सिद्धीस गेला, म्हणून परशुरामपंतांनीं त्यांच्या परमप्रिय गुरु महा-

राजांच्या ब्रह्मनाळ येथील वृंदावनास पूजाअर्चेच्या खर्चाबद्दल बारा गांवें इनाम देण्याचा विचार केला व तो त्यांच्या कानावर घातला. तो ऐकून त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, “ गांव घेऊन त्याच्या वसुलाचा हिशेब ठेवण्यांत वेळ घालविण्यापेक्षां आह्मांस गुरुमहाराजांच्या वृंदावनाची पूजाअर्चा व ईश्वरभजन हीं अधिक महत्वाचीं कामें आहेत. त्याकरितां आह्मांस ही उपाधि नको ! ” परंतु, परशुरामपंतांनीं विशेष आग्रह धरून राजाराम महाराजांकडून श्रीवृंदावनास ब्रह्मनाळ हा गांव इनाम दिला. पंतांच्या केवळ आग्रहामुळें हा गांव आनंदमूर्तींनीं स्वीकारला. ब्रह्मनाळ गांव दिल्याची सनद राज्याभिषेक शके २१ भाव संवत्सर जेष्ठ वद्य ७ सोमवार शके १६१६ या मितीची आहे. “ राजाराम महाराज चंदीहून सुरक्षित येतील व महाराष्ट्र राज्य पुन्हां होईल ” *ह्मणून आनंदमूर्तींनीं परशुरामपंतांस अभिवचनहि दिलें. तें पुढें खरें झालें व मराठ्यांचीं राज्यकारणें सिद्धीस गेलीं. परशुरामपंतांच्या पराक्रमासंबंधानें येथवर दोन दाखले दिले आहेत. त्यांनीं महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा बंदोबस्त ठेवून लोकांचे ठिकाणीं

---

* **टीप**:—ब्रह्मनाळचे मठांत परशुरामपंतांचें नांव घालून तयार केलेली आरती सांपडत नाहीं. पण वृंदावनाचे डोल कोणकोणत्या वेळीं झाले त्यासंबंधानें एक १६ कडव्यांची आरती आहे. तिचा बराच भाग फाटलेला आहे. त्यांतील दिसत असलेलीं अक्षरें उतरून घेतलीं. ती आरती येणेंप्रमाणें:—

जयजय श्रीगुरुमूर्ती ॥ कलियुगीं महाख्याति हो ॥ जडभोग

आवेश उत्पन्न करून मोंगलांचे ताब्यांतील मिरजेपासून रांगण्यापर्यंत सर्व मुलूख सोडवून त्याचा कारभार ते स्वतः करूं लागले.

---

चैतन्यस्थिति ।। वृंदावन डोले महा दीप्ती हो ।। जयजय मंगळमूर्ति हो ।। जयजय अगाध बोधकीर्ति ।। आनंदें डोले दीप्ती झाली त्रैलोक्ये विख्याति ।। ब्रह्मनाळीं कृष्णातीरीं रघुनाथ स्वामी हो ।। अंतपारि देह ठेविला निर्धारि हो ।। प्लवंग नाम संवत्सरीं हो ।। क्षय संवत्सरीं राम-नवमी यात्राभरि हो ।। आनंदाच्या गजरीं वृंदावन डोले चौफेरी हो ।। नवमी आणि दशमी सोळा प्रहर झाल्या नेमीं हो ।। ब्रह्मवृंदे अगणित धामीं हो ।। बाळे वृद्ध नाचति नेमिहो ।। ऐसें आश्चर्य झाल्यावरि यावर श्रीमुख संवत्सरीं हो ।। कौतुक पुनः करी राम-नवमीच्या अंतरीं हो ।। दुसरा आनंदडोल यात्रासमुदायाची मेळीं हो ।। दोन मूर्ति डोल अकरा बारा झाला खेळ हा तो ।। आणि संवत्सरीं तिसरा डोल आनंदभरि हो ।। अक्षतृतियावरि चतुर्थी मंदवासरीं हो ।। परशुरामजयंति दर्शन संगमाच्या अंतीं हो ।। आनंद हर्षेंचि डोले वृंदावन निजस्थिती हो ।। परशरामा भेटि हर्षे रामें दिधली भेटि हो ।। आनंद झाला सृष्टीं टाळया टाळया पडली मिठी हो ।। परशराम सोहळा वाद्यें भूगोळ गर्जविले हो ।। हरहर महादेव घोषें देव प्रसन्न झाला हो ।। ऐसें दिव्य क्षेत्र शंकर म्हणतो हें पवित्र हो ।। समता दश योजनें मात्र नांदे क्षेत्र स्वतंत्र हो ।।

रामराज्य येथूनि पूर्ण आशीर्वाद.

---

## परशुराम त्रिंबकांस प्रतिनिधिपदप्राप्ति व त्यांचा पराक्रम

### भाग ३ रा.

औरंगजेबाचा सरदार झुलपिकारखान यानें शके १६१३ ह्मणजे इ. स. १६९१ त जिंजीस वेढा दिला. तो शके १६२० ह्मणजे इ. स. १६९८ पर्यंत एकसारखा ७ वर्षें कायम होता; परंतु किल्ला सर झाला नाहीं. ह्यावरून किल्ल्याची मजबुती, किल्ल्यांतील युद्धसामुग्रीची विपुलता, असली माऱ्याची जागा ताब्यांत ठेवण्यांत श्रीशिवछत्रपतींचें दूरदर्शित्व व एकंदर मराठ्यांच्या अंगचें युद्धकौशल्य इत्यादि अनेक सद्गुण एकसमयावच्छेदेंकरून मनांत उभे राहतात. प्रल्हाद निराजी शके १६१८ [ इ. स. १६९६ ] त मरण पावल्यानंतर महाराष्ट्रांत शांतता होत चालली. आतां कर्नाटकांत राहण्याची आवश्यकता नाहीं, असें सर्वानुमतें ठरून राजाराम महाराज जिंजीहून निघून वाटेंतील मोंगल सैन्याबरोबर लढाई देत देत विशाळगडास येऊन दाखल झाले. नंतर शिवछत्रपतींच्या वेळीं असलेली रायगड ही राजधानी मोडून सातारा राजधानी केली. आपला ठावठिकाण शत्रूस लागतां उपयोगी नाहीं, ह्मणून श्रीशिवछत्रपतींनीं रायगड ही राजधानी त्या वेळीं केली होती; पण आतांच्या ह्या परिस्थितीच्या मानानें सातारा हेंच ठिकाण राजधानीस लायक होतें. कारण, ह्या वेळीं एकसारखा युद्धप्रसंग पडत असून, ताब्यांतील प्रांतांचा विस्तार झाल्यामुळें व त्या सर्व प्रदेशावर देखरेख ठेवण्याची आणि शत्रु उपस्थित होईल

तेथें त्यास तोंड देण्याची आवश्यकता वारंवार उद्भवूं लागल्यामुळें आणि सातारा हें शहर विशाळगड, पन्हाळगड, सिंहगड इत्यादि मजबूत किल्ल्यांच्या मध्यात् असल्यामुळें तेथेंच राजधानी करणें ह्या वेळीं युक्त होतें. ह्मणून तेथें राजाराम महाराजांनीं आपल्या गादीची स्थापना केली. आणि संकटप्रसंगीं ज्यांनीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून राज्याचें संरक्षण केलें त्या सर्वांची ह्या वेळीं सर्फराजी करण्यांत आली. त्या वेळीं परशुराम त्रिंबक, रामचंद्र निळकंठ व शंकराजी नारायण यांनीं राजाराम महाराजांस विनंती केली कीं, 'स्वामींचें राज्य आजपर्यंत कळलें तसें राखलें आतां स्वामींनीं बंदोबस्त करावा.' असें ह्मटल्या वरून स्वामींनीं उत्तर केलें कीं, ' पूर्वी तुह्मीच, व पुढेंहि तुह्मीच करणार,' याप्रमाणें बोलून व वस्त्रें देऊन त्यांचा सन्मान केला.

राजाराम महाराजांनीं सातान्यास येऊन राज्यकारभार सुरूं केल्या-वर पदाधिकारांत बदल झाला तोः—

प्रथम अमात्यपद रामचंद्रपंत यांजकडे असून, तें मध्यंतरीं जिंजी मुक्कामीं जनार्दनपंत हणमंते यांजला दिलें होतें, परंतु तें पुन्हां राम-चंद्रपंत यांना दिलें. शंकराजी नारायण यांस सचीवपद दिलें. प्रल्हाद निराजीचे पश्चात् त्याचा मुलगा नारो प्रल्हाद यास प्रतिनिधीपद दिलें होतें, पण तो कर्तृत्वहीन असल्यामुळें जिंजी मुक्कामीं तिमाजी रघुनाथ हणमंते यांस तें पद दिलें होतें; पण यावेळीं हणमंते हे जिंजीस मोंगलाचे कैदेंत असल्यामुळें प्रतिनिधीपद कांहीं दिवस परशुराम त्रिंबकांस दिलें.

त्या वेळीं परशुराम त्रिंबकास महाराजांनीं प्रतिनिधीपदाचीं वस्त्रें दिलीं तीं–

## प्रतिनिधीपदाचीं वस्त्रें

१ प्रथम भेटीसमयीं चादर बादली.

२ **पदाचीं वस्त्रें**:–भरगच्चा मंदील, चादर, पटका, किनखाप, महमुदी.

३ **दागिने**:–शिरपेच, कंठी मोत्याची, चौकडा मोत्याचा, तुरा[1], जिगा.

**किता**—शिक्केकटार, चौघडा, हत्ती नग २ व चवरी सोन्याचे दांडीची.

ढालतरवार, जरीपटका, घोडा, सोन्याचे काठीचा भालदार.

---

१ पुरुषाचें शिरोभूषण.

येणेंप्रमाणें वस्त्रालंकार व बहुमान देण्यांत आले. त्या वेळीं परशुरामपंतांस जो शिक्का देण्यांत आला तो असा—

श्री
श्री आई आदिपुरुष प्रसन्न ।।
श्रीराजाराम स्वामी कृपा
निधि तस्य परशुराम
त्र्यंबक प्रतिनिधि.

याप्रमाणें राजाराम महाराजांसारख्या कृपानिधींच्या कृपेनें परशुरामपंत हे प्रतिनिधी बनले. परशुराम त्रिंबक यांस प्रतिनिधीपद दिल्यावर तिमाजी हणमंते मोंगलाकडून सुटून विशाळगडास आले व राजाराम महाराजांस भेटले. तेव्हां, परशुरामपंतांकडील प्रतिनिधी ही पदवी काढून हणमंते यांस दिली व परशुरामपंतांस प्रधानपद देण्यांत आलें. त्या वेळीं जो शिक्का मिळाला तो[१]—

श्री
श्री आई आदिपुरुष प्रसन्न
श्रीराजाराम नरपती हर्ष
निधान परशुराम त्र्यंबक
मुख्य प्रधान

---

**टीप—१** मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ लेखांक १७४ मध्यें परशुराम त्रिंबकाचा 'प्रतिनिधी' ह्मणून व लेखांक

१७९ त 'प्रधान' ह्मणून असे दोन शिक्के आहेत. श्रीसमर्थसंप्रदायाचीं कागदपत्रें (धुळें) पान २१९ ते २२० लेखांक १५५ यांत परशुरामपंत पंतप्रधान ह्या पदवीधर असले वेळचें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे तें—

कार्तिक शुद्ध ११ शके १६२१

श्रीरघुनाथ

राजश्री साबराजी पागा व सिले (दार) लष्कर गोसावी यास अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य—श्नो॥ परशराम त्र्यबंक प्रधान आसीर्वाद (सु॥ सन) मया अलफ कसबे चाफल मौजे जालगेवाडी त॥ नाणेघोल हे गांव श्री वास्तव्य चाफल यास दिल्हे आहेत त्यास तुम्ही कोणी मार्गी येता जाता दोही गांवास उपसर्ग न लावणें कोण्ही श्रीच्या गावास उपद्रव लाविला आणि हुजूर बोभाट आला ह्मणजे त्याची घोडी पागे (त) लाविली जातील ऐसे बरें समजून वर्तणूक (करणें) जाणिजे छ ९ जमादिलावल प॥ हुजूर

~ श्री ०
श्री आई आदिपुरुष
प्रसन्न श्री राजाराम
नरपति हर्षनिधान
परशुराम त्र्यंबक मुख्य
प्रधान

विलसति
लेखना
वधि

औरंगजेब बादशहानें मराठ्यांचा नाश करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न केले. परंतु, त्यामुळें मराठ्यांचें कांहींहि नुकसान न होतां जोरावतच चालले. असें पाहून बादशहानें त्यांचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला; आणि महाराष्ट्रांतील किल्ले घेण्यासाठीं तो स्वतः निघाला. त्या वेळीं राजाराम महाराज हे बादशाहाशीं सामना करण्यासाठीं रामचंद्रपंत व परशुरामपंत यांना पाठवून आपण फौजेनिशीं उत्तरेकडील मुलखावर स्वारी करण्यास गेले. त्यांनीं चौथाई व सरदेशमुखी हे हक्क गोळा करून शाहूस शत्रूपासून सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, शाहू हा बादशहाबरोबर बेगमेच्या गोटांत गेला असल्यामुळें राजारामाचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. राजारामानें गंगथडी, नांदेड, खानदेश, वऱ्हाड वगैरे प्रांत काबीज करून संरक्षणासाठीं त्या त्या जागीं स्वतंत्र अमलदार नेमिले. नंतर साताऱ्यास परत येत असतां वाटेंत नवज्वराची भावना होऊन शके १६२१ फाल्गुन वा॥ ८ सह ९ रोजीं म्हणजे इ. स. १७०० च्या मार्च महिन्याच्या २ तारखेस शनवारीं रामचंद्रपंत अमात्य यांना कांहीं निरवानिरवीच्या गोष्टी सांगून व शाहूस सोडवून आणण्याबद्दल आग्रह करून हा मराठ्यांचा तिसरा राजा एकाएकीं मरण पावला!

औरंगजेब बादशाहा स्वतः महाराष्ट्रांत किल्ले घेण्यास निघाल्याचें वर सांगितलेंच आहे. ज्याप्रमाणें मनुष्य जिंकावयाचा म्हणजे त्याचें मन जिंकावें लागतें; नुसतें शरीर ताब्यांत ठेवून उपयोग होत नाहीं; त्याप्रमाणें महाराष्ट्र ताब्यांत घ्यावयाचा म्हणजे महाराष्ट्राचें संरक्षण ज्या किल्ल्यांनीं केलें जातें तें किल्ले स्वाधीन करावयाचे. म्हणून महाराष्ट्रां-

तील किल्ले एकामागून एक सर करण्याचा औरंगजेबाचा सपाटा सुरू होता. मराठे लोक शिकस्त होईपर्यंत मोंगलाशीं लढत व आतां आपला पाडाव होणार असें वाटूं लागलें ह्मणजे चीजवस्तांसह खालीं येऊन किल्ला मोंगलाचे स्वाधीन करीत. मोंगलाकडून त्यांनीं घेतलेल्या किल्ल्यांच्या संरक्षणाची योग्य तजवीज होत नसल्यामुळें मराठे ते किल्ले पुन्हां काबीज करीत, अशी स्थिति चालली होती. सातारच्या किल्ल्यास वेढा दिला त्या वेळीं परशुरामपंत हे परळीच्या किल्ल्यावर होते. सातारचा किल्ला सर होण्यासंबधानें शक्य तितके प्रयत्न बादशहानें केले परतुं किल्ला सर झाला नाहीं. सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. 'रामचंद्रपंत आम्हास वश आहे ह्मणूनच त्यानें सातारच्या किल्ल्यावर धान्यसामुग्रीची व्यवस्था केलेली नाहीं, असें कपटपत्र परशुरामपंतांच्या हातांत पोंचविण्यांत आलें. परंतु, त्यानेंहि बादशाहाचा इष्ट हेतु साध्य झाला नाहीं. मग फितुरीनें किल्ला सर करण्याचा प्रयत्न केला. तो असा—

सुभानजी लांवघरे हा सातारच्या किल्ल्यावर हवालदार होता. राजारामाच्या मृत्यूनंतर सातारच्या किल्ल्याभोंवतीं मोठ्या फौजेनिशीं औरंगजेब वेढा घालून बसला. किल्ला चांगला बळकट होता. बंदोबस्त करणारा प्रयागजी अनंत फणशे पनवेलकर प्रभु यानें धान्याचा तोटा आला, असें परळीवर परशुराम त्रिंबक होते त्यांना कळविलें. तें ऐकून परशुराम त्रिंबक यांनीं सातारच्या किल्ल्याच्या पश्चिमेकडील बाजूनें बादशाहाच्या सैन्यांत फितुर करून धान्याचे गोण वर चढविले. अशा रीतीनें नवीन धान्यसामुग्री किल्ल्यावर पोंचतांच मराठ्यांस नवीन दम आला.

आतां मात्र किल्ला सर होणें शक्य नाहीं, असें पाहून बादशहानें फितुर करण्यास सुरवात केली. किल्ल्याचा हवालदार सुभानजी लांबघरे यास सगळ्या परळी तर्फेची देशमुखी देण्याचें बादशाहानें कबूल केलें (मराठे लोकांस देशमुखी किंवा पाटिलकी या वतनाची लालूच फार असते, हें औरंगजेबास पूर्वीपासूनच माहीत होतें). पूर्वी सूर्याजी पिसाळानें वतनाच्या लालुचीनें ऐन वेळीं जसा रायगड मोंगलास दिला होता, तसाच सातारचा किल्ला मुसलमानास देऊन आपणहि आपला फायदा करून घ्यावा, असें सुभानजीस वाटलें व उभयपक्षांत फितुरीची वाटाघाटहि सुरू झाली. तत्संबंधीं एक फितुरीचें पत्र प्रयागजी अनंत, सातारच्या किल्लेदार याचे हातीं लागलें व त्यानें ती सर्व हकिकत लागलीच परळी किल्ल्यावर परशुराम त्रिंबकास कळविली. अमुक वेळीं मोंगलाचा हल्ला किल्ल्यावर चढणार व सुभानजी त्यास दरवाजा खुला करून देणार, अशा संकेताचें तें पत्र होतें. किल्ल्यावरील सर्व शिबंदी हवालदाराचे ताब्यांत असल्यामुळें त्यांस एकदम कैद करणें प्रयागजीस बरें वाटेना. अखेर परशुरामपंतांनीं विचार केला कीं, असा अकस्मात् किल्ला शत्रूचे हातीं गेला तर किल्ल्यांतील सर्व लोकांचा घात होईल. ह्मणून त्यांनीं औरंगजेबाचा पुत्र अजीमशाहा याचे मार्फत तहाचें बोलणें सुरू केलें आणि सर्व मराठी फौज हत्यारासुद्धां खालीं उतरून घेतल्यावर किल्ला स्वाधीन केला. याप्रमाणें सातारचा किल्ला मुसलमानांच्या हातीं गेला आणि सुभानजीनें परळी तर्फेचें सर्व उत्पन्न म्हणजे साठ गांवच्या देशमुखीचें वतन फितुर होऊन मिळविलें. त्यांपैकीं निमें उत्पन्न शाहूमहाराज यांनीं

देशीं आल्यावर सुभानजीकडून काढून तें प्रतापराव गुजर यांचे चिरंजीव खंडेराव यांस तो आपल्यासाठीं बादशहाचे छावणींत मुसलमान झाला या उपकाराची फेड म्हणून दिलें.

परळी आणि सातारा हे दोन किल्ले कसे काबीज झाले याविषयीं चमत्कारिक हकिकत कॉफीखानानें दिली आहे. ती अशी—राजाराम मरण पावला त्या वेळीं परशुराम त्रिंबक हे परळी किल्ल्यावर राहून राज्याचा सर्व कारभार पहात होते. राजारामाच्या मृत्यूची वार्ता ऐकून, परळीचे किल्लेदारास न विचारतां, परशुराम त्रिंबक एकदम बादशाहास शरण गेला. यामुळें किल्लेदार घाबरून जाऊन कांहीं शर्तींवर किल्ला बादशाहाचे स्वाधीन करण्यास तो तयार झाला. ह्या वेळीं बादशाहा साताऱ्यांत वेढा घालून बसला होता. सातारचे किल्ल्यावर सुभाना म्हणून हवालदार होता. त्याचें व परळीच्या किल्लेदाराचें वांकडें होतें. म्हणून परळी येथील किल्लेदाराचें म्हणणें नाकबूल केल्यास मी होऊनच सातारा व परळी हे दोन्ही किल्ले आपल्या स्वाधीन करून देतों, असें सुभानानें बादशाहाकडे बोलणें लाविलें; व बादशाहानें ही गोष्ट मान्य करून सातारचा किल्ला ताब्यांत घेतला; आणि सुभानास ५००० ची मनसबदारी दिली.

कॉफीखानानें म्हटल्याप्रमाणें परशुरामपंतांनीं भीतिग्रस्त होऊन सातारचा किल्ला बादशाहास दिला असें नसून राजकारणासाठीं दूरदर्शीपणानें पुढील धोरण लक्ष्यांत आणून दिला, हें वरील हकीकतीवरून समजण्यासारखें आहे. श्रीशाहूछत्रपतींकडून परशुराम त्रिंबकांस जी प्रतिनिधी-पदाची सनद मिळाली आहे तींत परशुराम त्रिंबकाच्या

पराक्रमाचा व एकनिष्ठपणानें सेवा केल्याबद्दलचा स्पष्टपणानें उल्लेख केलेला आहे. ती सनद येणेंप्रमाणें—

" स्वस्तिश्रीराज्याभिषेक शके ४० जयनाम संवत्सरे वैशाख शुद्ध ५ गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांनीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री परशुराम त्रिंबक पंडित प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसि जे तुम्ही स्वामी संनिध विनंती केली कीं, तीर्थस्वरूप महाराज राजाराम काकासाहेब कैलासवासी यांचे कारकीर्दीत राज्यांत श्रम साहस केले यास्तव प्रतिनिधीचें पद अजरामरामत वतनी आपणास करून दिलें आहे तरी तें पत्र पाहून नवीन पत्र करून द्यावें म्हणून त्यावरून तें पत्र पाहून मनास आणतां पूर्वी राज्यावर औरंगजेब बादशाहा दक्षिणेंत येऊन सातारा परळी विशाळगड व पन्हाळा या किल्ल्यास वेढा घालून बसले ते समयीं बादशाहाशीं झुंजण्याची शर्थ केली आणि पुन्हां बादशाहा माघारा फिरतांच जातिनीशी श्रम करून किल्ले घेतले चंदीस महाराज गेले होते तेथें धन्याचे साहित्याची सीमा केली तेथून साहेब देशीं आल्यावर राज्य स्वाधीन केले आणि आज्ञेप्रमाणें वर्तोन एकनिष्ठपणाची सीमा केली अशी महत्कार्ये करून राज्य रक्षण केले यास्तव तुम्हांवर कृपाळू होऊन प्रतिनिधीचें पद तुम्हांस वंशपरंपरेनें वतनी करून दिले असे भोसले यांचे वंशीं जो कोणी राज्य करील त्यानें तुमचे वंशाचे ठायीं ममतापुरस्सर विश्वास ठेऊन तुमचे वंशीं पद चालवावें यांसी अंतर करील त्याचें राज्यास श्रेयस्कर होणार नाहीं. तेरीख २ राबिलाखर सु॥ आर्बा "

यावरून परशुरामपंतांची योग्यता काय होती, त्यांनीं राष्ट्रकार्या-

कडे एकनिष्ठपणानें तनमनधन कसें अर्पण केलें होतें याची साक्ष पटते. त्यांनीं राष्ट्रकार्य उत्तम बजाविलें ह्याचें फळ त्यांना श्री जगदंबेच्या कृपेनें मिळालें. प्रतिनिधीशिवाय कोणत्याहि अष्टप्रधानाच्या सनदेंत " वतनी " अशीं अक्षरें नाहींत. फक्त तीं प्रतिनिधींच्या सनदेंत आहेत. यावरून परशुरामपंतांच्या योग्यतेसंबंधानें वेगळ्या पुराव्याचें कारण नाहीं.

काफीखानाच्या म्हणण्याप्रमाणें जर परशुरामपंत बादशहास शरण गेले असते तर इतक्या योग्यतेची पदवी आणि सनद त्यांना खचित मिळाली नसती. कारण, राज्यकर्त्यांकडून शत्रूस शरण जाणाऱ्याला पदवी व वतन मिळत नाहीं; तर शत्रूपासून राज्य संरक्षण करणाऱ्याला वतन वगैरे मिळत असतें. असो; परळी व साताराचा किल्ला मोंगल बादशहाच्या ताब्यांत देण्यांत मराठ्यांनीं जो धूर्तपणा ठेविला होता त्याचीच पुनरावृत्ति करून खेळणा ऊर्फ विशाळगड हा किल्ला ज्येष्ठ शुद्ध १२ शके १६२३ शुक्रवार ह्मणजे ता. ६ माहे जून सन १७०१ रोजीं मराठ्यांनीं बादशहाच्या ताब्यांत दिला.

राजारामाच्या मृत्यूची बातमी ऐकून बादशहा व त्याचे सरदार यांस, आतां मराठे आपलें डोकें कसचें वर करतात, असें वाटून आनंदीआनंद झाला. राजारामाच्या स्त्रिया व दोन अल्पवयी मुलगे यांस जिंकण्यास आपणांस मुळींच प्रयास पडणार नाहींत असें बादशहास वाटलें. परंतु मराठ्यांची जूट, त्यांच्या अंगची चिकाटी हीं दिवसानुदिवस वाढतच होतीं, हें बादशहाचें ध्यानांत आलें नाहीं.

राजारामाच्या राज्यव्यवस्थेनें लोकांच्या अंगीं एकप्रकारचा विलक्षण जोम आला होता. या जोमांत रामचंद्रपंतानें पुष्कळ भर घातली. राजारामाच्या मृत्यूचें वर्तमान सरदार लोकांना कळविते वेळीं ' आतां राज्यरक्षण करणें तुह्माकडेच आहे. सर्व लज्जा तुमचीच आहे. ' इत्यादि रामचंद्रपंतांच्या आत्मभावजनक व स्फूर्तिदायक शब्दांनीं सर्व सरदारांना दुप्पट स्फुरण चढलें व त्या सरदारांनीं रामचंद्रपंतप्रभृति मंत्रिमंडळाला राजारामाच्या ठिकाणीं समजून त्याचे हुकूम ते मोठ्या तत्परतेनें व उत्साहानें पाळूं लागले.

राजारामाच्या मरणानंतर ताराबाईनें आपला मुलगा शिवाजी याची मुंज करून त्यास राज्याभिषेक करावा म्हणून आग्रह धरला. रामचंद्र-पंत वगैरे मुत्सद्दी मंडळीच्या मनांत, शाहूची सुटका झाल्यावर उभय-तांच्या मुंजी एकदम करण्यांत याव्या, असा स्तुत्य हेतु होता. परंतु, ताराबाईच्या स्वार्थैकदृष्टीमुळें व तिला, रामचंद्रपंत हा आंतून बादशहास सामील आहे, ह्मणून सातारचा किल्ला बादशहाच्या हातांत गेला, असा संशय आला असल्यामुळें ती आपला हट्ट सोडीना. तेव्हां मुत्स-द्यांनीहि पुढील धोरणाकडे लक्ष पुरवून आपला आग्रह सोडिला. आप-सांत दुही माजवून शत्रूस सवड देण्यापेक्षां ताराबाईचा आग्रह पुरा करणें मुत्सद्यांना जास्त श्रेयस्कर वाटलें. सर्वांनुमतें मुंजीचा निश्चय करून समारंभ आटोपल्यावर इ. स. १७०१ त पन्हाळे मुक्कामीं ताराबाईचा मुलगा शिवाजी यास राज्याभिषेक करण्यांत आला. त्या वेळीं पूर्वीचेच अष्टप्रधान कायम करण्यांत आले. फक्त प्रतिनिधि-पद हणमंते यांजकडून काढून परशुराम त्रिंबकास दिलें. राजारामाचे

६६२५

कारकीर्दीत रामचंद्रपंतांनीं आपलें गेलेलें अमात्यपद पुन्हां मिळविलें आणि प्रतिनिधिपद आपल्यास द्यावयाचें सोडून हणमंते यांस देवविलें; यामुळें परशुरामपंतांचें अंतःकरण रामचंद्रपंतांबद्दल चांगलें नव्हतें. सबब ताराबाईस वश होऊन रामचंद्रपंतांचा अपमान करून, रामचंद्रपंतांचे मनांत नसतां, परशुरामपंतांनीं ताराबाईचे संतोषासाठीं शिवाजीची मुंज करून त्यास राज्याभिषेक करविला; आणि रामचंद्रपंतांस एका बाजूस सारून प्रतिनिधिपद आपणांकडे घेऊन राज्यकारभार चालविला, असा इतिहासांतरीं उल्लेख आहे. पण, यांत तथ्यांश दिसत नाहीं. कारण, रामचंद्रपंतांचे मनांत ताराबाई व परशुरामपंत यांच्याबद्दल कांहीं किंतु असतां तर, शाहूचें आगमन झाल्यावर त्या पक्षास येऊन मिळण्यास रामचंद्रपंतांस उघड मार्ग होता. परंतु तसें झालेलें नाहीं, इतकेंच नव्हे तर शाहूला मराठ्यांची गादी मिळूं नये अशाबद्दल झालेल्या कारस्थानांत परशुरामपंत व रामचंद्रपंत एकदिलानें होते. आमरणांत रामचंद्रपंतांनीं ताराबाईस सोडिलें नाहीं. अद्याप, रामचंद्रपंतांचा वंश कोल्हापूर इलाख्यांत पंतअमात्य पदवीवर बावड्यास आहे. परशुरामपंतांबद्दल रामचंद्रपंतांचें मत कसें होतें, हें पुढील पत्रावरून स्पष्ट होत आहे.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी नाम संवत्सरे ज्येष्ठ शु॥ १४ मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशिवछत्रपति याणीं समस्त राज्यकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशुरामपंडित प्रतिनिधि यासी आज्ञा केली ऐसीजे—तुमचे विशीं कितीएक राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांणीं विनंती केली ऐसीयास तुह्मी स्वामीचे

हितचिंतक कृतकर्मे विश्वासू सेवक आहां, तुमचें सर्वप्रकारें चालविणें स्वामीस अगत्य आहे. याकरितां तुह्मी कांहींएक संदेह न धरितां व कांहीं अनुमान न करितां पत्रदर्शनीं स्वार होऊन संतुबा यासहवर्तमान निघून स्वामीसन्निध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् चालवितील. येविशीं आनसारखे कांहीं न मानितां सत्वर येणें. येविशीं पंडित मशारनिल्हेनीं लिहिलें आहे, यावरून कळोन येईल. बहूत लिहिणें तरी सूज्ञ आहा. मर्यादेयं विराजते ( मोर्तब ).

यावरून परशुरामपंतांबद्दल रामचंद्रपंतांचे मनांत वांकडें नव्हतें, हें सिद्ध आहे.

परशुराम त्रिंबकास प्रतिनिधिपद मिळाल्यापासून इ. स. १७०७ पर्यंत ह्मणजे शाहू महाराज गादीवर हक्क सांगण्यास येईपर्यंत त्यांनीं काय काय राजकारणें केलीं व पराक्रम काय केला, याचा उल्लेख कोठें नसल्यामुळें माहिती देणें अशक्य झालें आहे. परंतु वरील मुदतींत त्यांनीं मोंगल शत्रूस डोकें वर काढूं दिलें नाहीं व स्वराज्यांत पाय शिरकावूं दिला नाहीं, हें निर्विवाद आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख किल्ले जिंकून औरंगजेबानें विजयानंदानें माघारी पाठ फिरविली नाही तोंच हे शूर मराठे सरदार पुनः सरसावले व त्यांनीं जोराचे हल्ले करून मोंगलांची दाणादाण उडवून पुनरपि सर्व प्रांत मोंगलांच्या ताब्यांतून हिसकावून घेतला. ह्या मराठ्यांच्या अद्भुत सामर्थ्याचें व विलक्षण चिकाटीचें हें लोकोत्तर प्रदर्शन मागें वळून पहात पहात औरंगजेबाच्या मराठ्यांच्या नाशाविषयीं सर्व आशा विलयास जाऊन त्याला महाराष्ट्रांतून एकसारखा पाय काढावा लागला.

आपण मोंगलाईंत अहमदनगरापर्यंत तरी सुरक्षित कसें पोंचतों, याचीच त्याला धास्ती वाटत होती. बादशहाच्या फौजेनें मराठ्यांची दहशत घेतली होती. इतलाखखान सरदारानें मोठ्या कष्टानें बादशहास कसें तरी अहमदनगरास आणून पोंचविलें. तेथें तो शके १६२८ माघ वद्य ३० ह्मणजे ता. २० माहे फेब्रुवारी १७०७ इसवी गुरुवारीं मरण पावला. आणि त्याच्या बरोबर, मराठ्यांशीं ३० वर्षे चाललेल्या युद्धाचाहि शेवट झाला.

## भाग ४ था.

औरंगजेबाच्या पश्चात् त्याच्या राज्यासंबंधानें त्याचे मुलांत तंटे लागले. अशा वेळीं झुलपिकारखानानें अजिमशहास, शाहूस बंधमुक्त केलें असतां, मराठ्यांत दुही माजून आपल्या राष्ट्रास मराठ्यांकडून उपद्रव व्हावयाचा नाहीं, असें कळविलें. ही झुलपिकारखानाची सल्ला अजिमशहास मान्य होऊन त्यानें इ. स. १७०७ च्या एप्रिल महिन्यांत शाहूस दक्षिणेंत जाण्याची परवानगी दिली. त्या वेळीं खालीं लिहिलेप्रमाणें अजिमशहानें शाहूशीं ठराव केला. “ तुह्मीं आपणांस दिल्लीच्या बादशहाचे अंकित समजून राज्य करावें. तुमची आई, भाऊ ( संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग ) व बायका यांस आह्मापाशीं ठेवावें. तसेंच तुह्मी आपल्या राज्यांत जाऊन बंदोबस्त करावा, व बखेडा करणारे लोकांचें पारिपत्य करावें. बादशाही लक्षांत वागवून बादशाही मुलखास उपद्रव होऊं नये. तुह्मी याप्रमाणें वागतां

अशी हुजूर खातरजमा झाली ह्मणजे आह्मी दिल्लीस गेल्यावर व तेथें सिंहासनारूढ झाल्यावर तुमचीं माणसें तुह्माकडे लावून देऊं व तुह्मांस सरदेशमुखीचें उत्पन्न सहा सुभ्यांत चालतें त्याची सनद त्याचप्रमाणें सहा सुभ्याच्या चौथाईची सनद देऊं. तसेंच बालेघाटावरील महाल, विजापूर व दौलताबादचे बादशाहींतील महाल, भीमा व गोदावरी यांचेमधील निमा मुलूख ह्यांतील बादशाही ठाणीं, किल्ले, कोटसुद्धां दरोबस्त तुह्मास बक्षीस करून देऊं. तूर्त 'यांचें राज्य हे बंदोबस्तानें करतील' अशीं पत्रें आमचे सुभ्यास देण्याकरितां तुह्मापाशीं देतो. कर्नाटक, गोंडवण, गुजराथ, तंजावरचें राज्य ह्यांचा अंमल तुमचेकडे चालत आहे तो तुह्मी तसाच चालवावा व नेहमीं बादशहाचे हुकुमांत वागून प्रसंग पडेल तेव्हां आपल्या फौजेनिशीं मदत करावी" याप्रमाणें करार करून वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे व कांहीं स्वार त्यांजबरोबर दिले आणि पुढें जातां जातां आपली फौज जमा करीत जावें ह्मणून सांगितलें. ह्याप्रमाणें पडल्या फळाची आज्ञा घेऊन व सर्व कांहीं कबूल करून शाहू एकदम दक्षिणेंत येण्यास निघाला. गोदावरी नदी उतरून अलीकडे आल्यावर शाहूनें ताराबाईस, आम्ही बादशहापासून निघून मुकामास येऊन पोहोंचलों, लवकरच भेटीस येतो असें लिहिलें होतें.

तें पुतण्याचें पत्र पाहून ताराबाईस समाधान झालें नाहीं. ती कर्तृत्ववान व महत्वाकांक्षी बाई होती. संभाजीच्या मृत्यूपासून शाहू बादशाहाच्या कैदेंत होता. इतक्या अवकाशांत औरंगजेबानें मराठी राज्याचा नाश करण्यासाठीं अघोर प्रयत्न केले; पण आपला नवरा

होता म्हणूनच राज्य वांचविलें. पुढें नवरा मेल्यावर तरी मी स्वतः राज्यरक्षणार्थ किती तरी झटले व आतां इतकी दगदग करून वांचविलेलें राज्य घेऊन, आयत्या पिठावर रेघा ओढण्याकरितां, हा शाहू तयार झाला आहे, असे विचार तिच्या मनांत आले व शाहूस राज्य न मिळूं देण्याविषयीं तिनें घाट घातला; आणि सर्व कारभारी मंडळीस एकत्र जमवून शाहूस मोडून काढण्याचा बेत तिनें जाहीर केला. किल्लेकऱ्यांस व सुभ्यांतील अम्मलदारांस तिनें ताबडतोब हुकूम पाठविले कीं, " किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नये, खर्चास मुलुखांतील वसूल देऊं नये." शिवाय रामचंद्रपंतांनीं ताराबाईजवळ राहून राज्याचा बंदोबस्त ठेवावा आणि परशुराम त्रिंबक प्रतिनिधि, धनाजी जाधव सेनापति व खंडो बल्लाळ चिटणीस, यांनीं लढाई करून, शाहूचा पक्ष कमी जोराचा होईल, अशी खटपट करण्याची व्यवस्था ठरवून दिली. त्याप्रमाणें पुणें नजिक खेडकडूस येथें शाहूचा मुक्काम होता, तेथें चाल करून प्रतिनिधि, धनाजी जाधव सेनापति, खंडो बल्लाळ चिटणीस, वगैरे आले. धनाजीच्या मनांत पहिल्यापासूनच शाहू खरा कीं खोटा हा निकाल लावून घ्यावा व खरा असल्यास त्याच्या बाजूस मिळावें असें होतें. त्यानें शाहूची छावणी जवळच आहे असें पाहून खंडो बल्लाळास गुप्तपणें शाहूच्या खरेखोटेपणाविषयीं चौकशी करण्यास पाठविलें. चौकशीअंतीं शाहू खरा अशी खंडो बल्लाळाची खात्री झाली, हें ऐकून शाहूस मिळण्याचा धनाजीचा बेत कायम झाला. सेनापतीचें मन वळविण्याकरितां शाहूकडून माणसें आलीं. तेव्हां तर धनाजी

शाहूस पूर्ण अनुकूल झाला. परंतु प्रतिनिधीचा युद्ध करण्याचा हेका सुटेना. तेव्हां, धनाजीनें कपटयुद्ध करण्याचा बेत केला. दोन्ही सैन्यांत युद्ध सुरू झालें. तेव्हां, प्रतिनिधी मात्र जोरानें लढला. शाहूचा हत्ती धनाजीच्या घोड्यापर्यंत आला तरी धनाजी जागचा हालला सुद्धां नाहीं. प्रतिनिधींचें एकट्याचें काय चालणार? प्रतिनिधी व त्याच्या पक्षाचे लोक यांचा पराभव होऊन त्यांस पळ काढावा लागला. नंतर धनाजी शाहूस भेटला. दुसरे दिवशीं शाहूनें धनाजीस बोलावून नेऊन त्याचा मोठा सन्मान केला व त्यांस सेनापतिपदाचीं वस्त्रेंहि दिलीं. खंडो बल्लाळास चिटणीशी सांगितली. परशुराम त्रिंबक प्रतिनिधी हे साताराचा किल्ला बळकावून बसले आणि झालेली सर्व हकीकत ताराबाईस कळविली. शाहूमहाराजांनीं प्रतिनिधि वश व्हावे ह्मणून फार प्रयत्न केले; पण, प्रतिनिधि शाहूस अनुकूल झाले नाहींत. त्यांनीं अखेरपर्यंत साताराचा किल्ला शाहूस न देण्याचा निश्चय केला. परशुरामपंताजवळ विशेषसें सैन्य—बळ नव्हतें. तथापि त्यांनीं स्वतःच्या मर्दुमकीमुळें किल्ल्यावर शाहूचें निशाण फडकूं दिलें नाहीं. अर्थात समर करून किल्ला हस्तगत होत नाहीं, असें पाहतांच शाहू राजानें किल्ल्यांत भेद करून परशुरामपंत प्रतिनिधि यांना कैद करावें व किल्ला हस्तगत करावा, असा विचार केला.

परशुरामपंताचे हाताखालीं शेखमिरा ह्मणून एक मुसलमान जमादार होता. त्याचीं बायकामुलें वांईस होतीं. तेथें त्यांस त्रास देऊन त्यांच्याकडून शाहूमहाराजांनीं शेखमिऱ्यास अनुकूल करून घेतलें. शेखमिऱ्याचें प्रेम परशुरामपंतांवर फार होतें, त्यामुळें त्यांच

अकल्याण व्हावें असें त्याच्या मनांत नव्हतें. तेव्हां शेख-मिऱ्यास ज्याकरितां अनुकूल करून घेतलें तें ह्मणजे परशुराम-पंतांस कैद करण्याचें काम जुळेल असें दिसेना. परंतु शेखमिरे हा स्वार्थ साधण्यांतहि सदा जागरूक असल्यामुळें आपलें व आपल्याबरोबर परशुरामपंतांचेंहि कल्याण साधण्याचें ह्या वेळीं त्याच्या मनांत आलें. शाहू महाराजांकडून "तूं जें मागशील तें देईन" असें आश्वासन घ्यावें व परशुरामपंतास प्रथम शाहूच्या ताब्यांत द्यावें आणि नंतर मागणें ह्मणून "परशुरामपंतांस कैदेंतून मुक्त करा' हेंच मागणें मागावें असा उभयहेतुसाधक विचार शेखमिऱ्यानें केला व त्यामुळें शाहूमहाराजांच्या स्वाधीन परशुरामपंतास केलें. नंतर सातारचा किल्ला शाहूमहाराजांनीं सर केला.

---

१ शाहू महाराजांनीं सातारचा किल्ला सर केल्या वेळची हकीकत बखरींत आहे ती खालीं लिहिल्याप्रमाणें:—"शाहू महाराज किल्ल्यावर येऊन गादीवर बसून द्वाहो फिरवून, लहान थोर जे भेटले नव्हते ते सर्व लोकांनीं मुजरा करून कचेरी बरखास्त झाल्यावर परशरामपंत यांस बोलावून एक जेठीस आणून परशुरामपंतांचे उराबर तक्ता देऊन जेठीस बसवून किल्ला न दिला सबब शासन करण्याचा इरादा धरून दम काढण्याचा विलाज मांडिला. जवळ कोणी नाहीं. संकट प्राप्त झालें खंडो बल्लाळ किल्ल्यावरच वाड्यानजिक घर होतें, स्नानास बसले पाणी दोन चार तांबे घेतले. इतक्यांत वर्तमान बातमीदारानें येऊन सांगितलें. तें ऐकतांच तसेंच पागोटें डोईवर ठेवून धांवत वाड्यांत जाऊन पाहिलें. तों एक जेठी उरावर बसला. आणि महाराज जवळ उभे आहेत हें दृष्टीस येतांच महाराजास न विचारतां

या दिवशीं शनवार होता. या दिवसापासून साताऱ्च

महाराजांचे तोंडापुढें हात ओवाळून, अशांनीं तुह्मी राज्य कराल हे कळोन आले. संभाजी महाराजांचे पोटीं पोर होऊन आला असतां तरी एक घर चांगले वसते, करीतां नीट होते, लेक होऊन आला. आणि राज्य करावयाचा अधिकार दैवानें प्राप्त झाला असोन अशीं माणसें अशा कारणांनीं मारतां कळली अक्कल. अशांनीं राज्य कराल हें समजून आले, असें बोलून उडी मारून एकदम जेठीचें नरडें आवळोन धरून, लाथेनें तकता ढकलून परशुरामपंतास हातीं धरून आपले बिऱ्हाडीं घेऊन आले. महाराज दिनदयाळ खंडेरायांनीं परशुरामपंतास हातीं धरून अमर्यादा करून बोलले असतां सहन करून उगेंच राहिलें आणि परशुरामपंतास नको नेऊं असें कांहीं न बोलतां स्तब्ध पाहतां खंडोबा घेऊन गेले. घरीं जाऊन स्नान संध्यादि भोजन संपादिलें विडे घेतले सायंकाळ झाली दिव्यास तेल नाहीं व घोड्यास चंदी वगैरे कांहीं पदार्थ कोठींत नाहीत. रात्र पडतां अंधार होत चालला मशालजी विचारावयास आले महाराज तोंडाकडे पाहतात कारभारी जवळ कोणी नाहीं ते समयीं केशरकर वगैरे खिजमतगार जवळ होते. त्यांनीं सांगितले महाराज खंडोबास बोलवावे त्याजवांचून सल्ला कोणी सांगणार नाहीं तजवीज होणार नाहीं. हें ऐकून बोलवायास हुकूम झाला बोलावून नेले. तेल, शिधा, चंदी याचा तजवीज काय ह्मणून विचारलें. खंडोबांनीं विनती केली कीं, महाराज राज्य करावयास आले दोन वर्षांत खेताची जागा हस्तगत झाली नाहीं. ह्मणून खराब झाले आतां जागा मिळून दिव्यास तेल नाहीं, पोटास नाहीं चंदी नाहीं हें कळोन पुढील चालविण्याची नजर कशी याचा विचार सुचला. महाराज हे करणें किल्ला घेतला, गादीवर बसला तेच समयीं कांहीं विचार करा-

किल्ला सर केल्याची आठवण ह्मणून मराठी राज्यांत दर

---

वयाचा वेळ जाऊन पश्चात बुद्धि तयास म्हणावी असो. आज्ञा जाहली विचार न सांगितला तरी वाईट याजकरितां सांगतो त्या रीतीनें चालले तर सर्व गोष्टी चालतील, निभेल, नाहीं तर वडिलांनीं माणसे मारली. आपणाशी राजी कोणी न ठेविले जातीनें प्राणानिशी गेले आतां तुह्मीच चांगले यशध्वज संपादोन हजरतच्या आज्ञेनें राज्यावर आला. येऊन प्राण घेणेचीच कर्मे आरंभिली या कारणांनीं तुम्हास राजी कोण राहतो. दौलत कशी चालते ? हा विचार मनांत कसा आणिला नाहीं. अस्तु झाली गोष्ट ती बरीच झाली. वाहिली गंगा आणि राहिले तें तीर्थ म्हणून सांगतो त्या रीतीनें चाला ह्मणजे सर्व गोष्टी पार पडतात. असें सांगितल्यावरून बरें आहे सांगा उत्तर जाहले. मग खंडोबांनीं विनंती केली कीं, ( कोणी चांगला मनुष्य पाठवून परशुरामपंतास आणा आणि त्याचे मांडीवर डोकें टेवून सुरी हातांत देऊन शिर सुरी तुझे हातीं आहे कोणे विषयीं मनांत न आणितां ही दौलत माझी असें मानून जे उचित ते करा ह्मणून किल्ला सोडून वागतो ह्मणशील तर डोई उचलतो नाहींतर उचलीत नाहीं ). तो पुरुष चाकरीस नेकदार आहे. वचनास गुंतल्यावर प्राण गेला तर बेहत्तर ह्मणून पृथ्वी इकडील तिकडे ठेवण्याविषयीं कृतकर्मा सर्व धोरणें त्याचे स्वाधीन आहेत. याप्रमाणें करावें मग मर्जी. असें बोलतांच महाराजांनीं सांगितलें कीं तुह्मीच जाऊन घेऊन या, सांगितल्याप्रमाणें करतो. असें सांगितल्यावरून खंडेरायांनीं केशरकर यांस पाठविले. ते जाऊन महाराजांची आज्ञा व खंडेरायाचा निरोप कळवून चला म्हणतांच परशरामपंत उठोन त्या समागमे वाड्यांत आले. महाराजांस मुजरा करून उभे राहिले. हें पाहून महाराजांनीं जवळ बोला-

शनिवारीं नौबद झडण्याचा प्रघात सुरू झाला. (नागपूरकर भोसल्यांची बखर पान २१.)

---

ऊन हातीं धरून बसविले. मग मांडी घालतांच आपली मान ठेवून परशुरामपंताचे हातीं हातांतील खंजीर देऊन शिर सुरी तुझे हातीं. वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ कोणेविशी वाकडे मनांत न आणितां ही दौलत माझी असें मानून जे उचित ते करा. असें ह्मणतांच परशुरामपंतांनीं, आपण खावंद आम्ही चाकर इतके उपरोधाचें कारण काय जी आज्ञा होईल त्याठिकाणीं प्राण वेचावा हाच आमचा निरधार या विषयीं हेच पाय साक्षी. दुसरी कल्पनाच आमचे मनांत नाहीं. आपण उठावे आज्ञा करावी उणें पडेल तेथें काय ह्मणणें ते ह्मणावें, असें बोलतांच महाराज खूष होऊन उठले आणि प्रतिनिधीपदाचीं वस्त्रें दिलीं ती बीतपशील."

| वस्त्रें | कित्ता |
|---|---|
| मंदील. | ढाल तलवार पेपकब्रज. |
| चादर भरजरी. | शिक्के कटार. |
| महमुद्या दोन. | हत्ती सरंजामसुद्धां. |
| किनखाप. | घोडा सरंजामसुद्धां चवरी. |
| पटका. | पालखी सरंजामसुद्धां अबदागिरी. |
| झगा. | चौघडा सरमजामसुद्धां जवाहीर, |
| | कंठी शिरपेंच तुरा आंगठ्यासुद्धां. |

२. श्रीशिवछत्रपतींनीं शके १५८१ विकारीनाम संवत्सरे श्रावण शुद्ध ५ शनवार रोजीं सातारचा किल्ला घेतला आणि त्या दिवसापासून मराठी राज्यांत शनिवारीं नौबद झडूं लागली.

याप्रमाणें सातारचा किल्ला शाहू महाराजांस मिळाल्यावर त्यांनीं शेखमिरा यांस ‘ तुला काय पाहिजे तें माग ’ म्हणून आज्ञा केली. त्या वेळीं शेखमिऱ्यानें ठरविल्याप्रमाणें “ माझे धनी परशुरामपंत यांस मुक्त करावें आणि त्यांना पूर्ववत् प्रतिनिधिपदाचीं वस्त्रें द्यावींत. ” हें मागणें मागितलें. परशुरामपंतासारखा कर्तृत्ववान् माणूस वश झाला असतां आपला मोठाच कार्यभाग साधेल, अशा समजुतीनें परशुरामपंतांस आपल्याजवळ बोलावून आणून शेखमिऱ्याची मागणी त्यास कळविली. त्या वेळीं परशुरामपंतांनीं शाहूमहाराजांस उत्तर दिलें कीं, “ शेखमिरा यानें जें काय मागितलें तें सेवकधर्मास अनुसरूनच आहे. परंतु त्याच्याप्रमाणें मला माझें वचन बदलतां येत नाहीं. मी कैदेंत राहीन. परंतु माझ्या स्वामिणीशीं कृतघ्न-पणाचें वर्तन करणार नाहीं. ” ही स्वामिनिष्ठा व राजनिष्ठा पाहून शाहूमहाराजांस अचंबा वाटला आणि परशुरामपंत प्रतिनिधिपद स्वीकारीत नाहींत असें पाहून त्यांना सातारचे किल्ल्यावर खर्चाचा योग्य बंदोबस्त करून कैदेंत ठेविलें आणि शेखमिऱ्याच्या उपकार–ऋणांतून मुक्त होण्याकरितां पुन्हा त्यांस आणखी तुला काय पाहिजे तें माग, अशी आज्ञा केली. त्यावर शेखमिऱ्यानें जे ६० शिपाई ह्या राज-कारण प्रसंगीं अनुकूल झाले, त्यांस स्वाराची तैनात द्यावी असें पुन्हां मागणें केलें. त्यावरून शाहूराजानें त्यांजवर संतुष्ट होऊन, त्यांस ६० हजारांचा सरंजाम दिला व प्रतिनिधिपद गदाधर प्रल्हाद यांस दिलें.

सातारा किल्ला शाहूराजाचे हस्तगत झाल्यानंतर व परशुराम त्रिंबक यांच्या प्रतिबंधांत सांपडल्यावर राजकारस्थानपटु ताराबाई साहेब ह्या आपलें धैर्य खचूं न देतां कोल्हापूरप्रांतीं आल्या व त्यांनीं आपले प्रामाणिक मंत्री रामचंद्रपंत अमात्य यांच्या सहाय्यानें पन्हाळा येथें स्वतंत्र गादी स्थापन केली. तेव्हां, त्यांच्यामध्यें व शाहूराजामध्यें गृहकलह माजून अनेक दिवसपर्यंत चढाओढ चालली होती. शाहूराजास बहुतेक मराठे सरदार अनुकूल झाले व त्यांच्या सहाय्यानें त्यांस सातारा येथील छत्रपतीची गादी प्राप्त झाली. ताराबाईसाहेबांनीं आपल्या पक्षास पूर्वीचे प्रमुख सरदार अनुकूल करून घेऊन आपलें वर्चस्व संस्थापित करण्याकरितां राजकारस्थानें चालविलीं होतीं. ह्या वेळीं पुष्कळ मराठे सरदार ताराबाई साहेबांच्या पक्षाचे अभिमानी असून ते त्यांच्याकरितां झटत होते. त्यांतच परशुराम त्रिंबक हेहि होते. त्यांनीं अनेक मसलती करून सर्व सरदारांमध्यें ऐक्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला परंतु अखेर ह्यांची सरशी झाली नाहीं. शाहूचें वर्चस्व कायम झालें व त्यांचा पक्ष प्रबल होऊन सर्व शूर सरदार व मुत्सद्दी त्यास जाऊन मिळाले.

परशुरामपंत हे ताराबाईच्या वचनांत गुंतले होते व आपसांत दुही माजवून राष्ट्राचें नुकसान करण्यापेक्षां आपण स्वस्थ बसावें, असा परशुरामपंतांनीं निश्चय केला. परशुरामपंतांचा व शाहूनहा-

राजांचा समेट खंडो बल्लाळ चिटणीस यांनीं केला. शाहूमहाराजांसहि परशुरामपंतांसारखा खरा राजकार्यधुरंधर मुत्सद्दी अनुकूल झाल्यामुळें त्यांनीं गदाधर प्रल्हाद यांचेकडील प्रतिनिधीचें पद काढून तें परशुरामपंत यांस शके १६३२ पौष शु॥ ८ रविवार चंद्र ६ जिल्काद इहिदे अशर मया व अलफ ह्मणजे इ. स. १७१० डिसेंबर ता. १७ रोजीं अर्पण केलें व त्यांच्याकडे प्रांत व किल्ले यांचा सरंजाम देण्यांत आला. तो—

**मुलखगिरी सुभेहाय**—प्रांत राजापूर, प्रांत दाभोळ, प्रांत महिपतगड, प्रांत जावळी, प्रांत मंगळगड, प्रांत वाई, प्रांत सातारा, प्रांत कराड, प्रांत व्याघ्रगड, प्रांत मल्कापूर, प्रांत पन्हाळा, प्रांत तारळे, प्रांत कोल्हापूर, प्रांत खटाव, प्रांत माण, प्रांत मिरज. एकूण १६.

**किल्लेहाय**—किल्ले विशाळगड, महिपतगड, प्रचितगड, सारंगगड, जयगड, व्याघ्रगड, महिमल्लिनगड, रसाळगड, सुमेरगड, मकरंदगड, प्रतापगड, मंगळगड, गहनगड, जंजिरे, रत्नागिरी, कमळगड, पांडवगड, वैराटगड, वंदनगड, चंदनगड, कल्याणगड, वर्धनगड, संतोषगड, महिमानगड, भूषणगड, सातारा, सज्जनगड, बारागड, सुंदरगड, गुणवंतगड, वसंतगड, पन्हाळा, पावनगड, गगनगड कोट कोल्हापूर. एकूण ३५.

शाहू महाराजांनीं ज्या वेळीं परशुरामपंतांस प्रतिनिधीपदाचीं वस्त्रें दिलीं त्या वेळीं जो शिक्का दिला तो—

श्री
श्री आई आदि पुरुष॥ श्रीराजा
शाहूछत्रपती स्वामी कृपा
निधि॥ तस्य परशुराम
त्रिंबक प्रतिनिधि.

ह्याप्रमाणें परशुरामपंतांस शाहू महाराजांनीं सरंजाम व प्रतिनिधी-पद दिलें. परंतु तें त्यांजकडे फार दिवस टिकलें नाहीं कारण, कोल्हापूर प्रांतांत जीं शाहू महाराजांचे विरुद्ध कारस्थानें चाललीं होतीं त्यांत परशुरामपंतांचे चिरंजीव कृष्णाजी परशुराम हे असलेमुळें त्यांत त्यांचें अंग आहे असा शाहू महाराजांस संशय येऊन त्यांनीं इ. स. १७११ मध्यें परशुरामपंतास कैद केले आणि त्यांच्याकडून प्रतिनिधींचा अधिकार घेऊन तो पुन्हा प्रल्हाद निराजीचे दुसरे चिरंजीव नारायण प्रल्हाद यांजकडे दिला. परशुरामपंतावर शाहू महाराजांची बरीच गैरमर्जी झाली. तशांत त्यांचे वडील चिरंजीव कृष्णाजीपंत यांनीं फौज घेऊन शाहू महाराज यांचे प्रांतांत दंगा केला. हें वर्तमान ऐकतांच महाराजांस विशेष संताप येऊन त्यांनीं परशुराम-पंतास त्यांचे डोळे काढून जिवे मारण्याबद्दल हुकूम दिला. त्याप्रमाणें त्यांचे उरावर तक्ता ठेवून एका मल्लास त्यावर बसवून नापिकाहस्तें त्यांचे डोळे काढण्याची तयारी झाली. त्या वेळीं परशुराम

त्रिंबक यांचे दुसरे चिरंजीव श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव हे साताऱ्यास होते. त्यांनीं हें वर्तमान महाराजांच्या लोभांतले प्रसिद्ध मुत्सद्दी खंडो बल्लाळ चिटणीस ह्यांस निवेदन केलें. ते त्या वेळीं स्नान करीत होते. तथापि तसेंच ओलया वस्त्रानिशीं राजवाड्यांत आले आणि त्यांनीं महाराजांचा या कृत्याबद्दल फार कडक शब्दांनीं निषेध केला. परशुरामपंतांच्या उरावर बसलेल्या नापिकाच्या तोंडांत मारून त्यास दूर केलें. त्यांच्या उरावरील तक्ता एकीकडे करून त्यांस आपले घरीं नेलें व स्नान करून उभयतांनीं भोजन केलें. नंतर दुपारीं राजवाड्यांत येऊन परशुरामपंतांस महाराजासंनिध उभे केले आणि महाराजांस विनंति केली कीं, परशुरामपंतासारख्या कर्त्या व जुन्या माणसाचा आपण छळ करीत आहां त्याअर्थीं मजला निरोप द्यावा. परशुरामपंतासारखे सरदार अशा तऱ्हेनें मारणें अगदीं कमीपणाचें काम आहे. असे सरदार मारावयाचेच असतील तर लढाईंत पाठवून धारातीर्थीं मरूं द्यावेत, मुलानें अपराध केला त्याबद्दल बापास शिक्षा देणें न्याय्य नाहीं. हे चिटणिसांचे प्रांजल व निस्पृह शब्द ऐकतांच शाहूमहाराजांस पश्चात्ताप झाला व त्यांनीं खंडो बल्लाळचें बहुत प्रकारें समाधान केलें आणि परशुरामपंतांचें पूर्वींचें शौर्य, पराक्रम व स्वामिसेवा हीं लक्षांत घेऊन त्यांनीं, त्यांचा कोणत्या रीतीनें परामर्ष घेऊं, असें चिटणिसास विचारिलें. चिटणिसांनीं त्यांचें प्रतिनिधीपद त्यांस देऊन त्यांचा सर्व

सरंजाम व सरदारी त्यांच्याकडे चालवावी अशी विनंति केली ती महाराजांनीं मान्य केली[1].

याच संधीस कृष्णराव खटावकर यांनीं शंभु महादेवाकडे दंगा केला. त्याच्या बंदोबस्ताकरितां बाळाजी विश्वनाथ भट सेनाकर्ते व श्रीनिवास माधव ऊर्फ श्रीपतराव, यांचेकडे २०० स्वारांची सरदारी होती, यांची योजना झाली. ते जातांना परशुराम त्रिंबक यांचे निरोपास गेले वेळीं परशुरामपंतांनीं सांगितलें कीं, तुम्ही जाऊन सरकार चाकरी उत्तम प्रकारें बजावून आमची सुटका होईल असें करावें. श्रीपतरावांनीं सेनाकर्ते यांना चांगली मदत केली व खटावकर यांचें पारिपत्य करून विजय मिळविला. त्यामुळें शाहूमहाराज संतोषित होऊन त्यांनीं परशुरामपंतांची सुटका करून फार गौरव केला; आणि अवचित बाबुराव हणमंते यांजकडील प्रतिनिधीपद काढून तें परशुराम त्रिंबकास वंशपरंपरेनें अर्पण केलें व सनद करून दिली ती पान ४८ येथें दिली आहे (ता. ८।४।१७१४) ह्याप्रमाणें परशुरामपंतांच्या पूर्वीच्या अप्रतिम स्वराज्यसेवेचें शाहूमहाराजांनीं योग्य चीज केलें. ह्यानंतर परशुरामपंतांवर शाहूमहाराजांची कधींच अवकृपा झाली नाहीं. उलट

---

१ चिटणीस यांनीं परशुरामपंतांचे जिवावरील संकट दूर केल्याबद्दल त्यांस चाफळानजीक माजगांव ह्मणून एक गांव आहे तो इनाम दिला व श्राद्धाचे दिवशीं चिटणीस घराण्यांतील कोणाही खाशास ब्राह्मणाबरोबर जेवावयास बसवीत असत; ही वहिवाट भवानराव प्रतिनिधी अखेर होती; हल्लीं चालू नाहीं.

त्यांच्या दरबारांत परशुरामपंताचा विशेष पगडा बसून दिवसेंदिवस त्यांचा गौरव अधिकच होऊं लागला.

परशुरामपंत हे जुने माहितगार, दौलतीचे पूर्ण अनुभवी व राजकारणांत वाकबगार असल्यामुळें त्यांच्या मसलतीचा महाराजांस चांगला उपयोग होऊं लागला. त्यामुळें महाराजांनीं प्रत्येक राजकारणांत त्यांची पोक्त सल्ला घेऊन राज्याची अभिवृद्धि केली. त्यांनीं वेळोवेळीं परशुरामपंतावर प्रसन्न होऊन त्यांस नवीन इनामें करून दिलीं. त्या वेळीं जीं राजपत्रें करून दिलीं त्यांतील दोन नमुन्यासाठीं देत आहें.

## ही अस्सल सनद आहे.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३९ नंदन संवत्सरे श्रावण बहुल चतुर्थी मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशरामपंडित प्रतिनिधी यांस आज्ञा केली ऐसिजे तुम्ही स्वामीच्या राज्यांत श्रमसाहस बहुत करून पायासी निष्ठा धरिली या करि ( ता ) तुम्हावरी कृपाळु होऊन मौजे किन्हई समत कोरेगांव सुभा प्रांत वाई कुलबाब कुलकानु सर्व माप करून खेरीज कदीम हाकदार व ईनामदार असतील ते वजा करून तुम्हास इनाम दिल्हा असे तुम्ही व आपले वंशपरंपरेनें ईनाम अनभवणे स्वामी तुह्मास मौजे मजकुर इनाम प्रतिवर्षी चालवितील जाणिजे **बहुत लिहीणे तर तुह्मी सुज्ञ असा.**

खालील उतारा श्रीशाहुमहाराजांचे डायरींतून घेतला आहे.

वतनपत्र छ ९. रमजान वतन सरदेशमुखी प्रांत कडेविलीत ( कडेवळीत ) येथील पूर्वी कैलासवासी राजश्री काकासाहेबी आजरा-मऱ्हामत करून दिले त्याप्रमाणें अनुभवीत आले स्वामीनींही वतनाची पत्रे करून देऊन वतन चालविले त्यावरी छ २० सवाल सन इसने मशारनिल्हेकडून स्वामीसेवेस अंतर पडले हे सबबे अमानत करून हुजूर ठेवून जोत्याजी केदारकर ( जोत्याजी केसरकर ) यांचे स्वाधीन केले होते ऐशियास मशारनिल्हे स्वामीचे पुरातन सेवक या राज्यामध्यें श्रमसाहस बहुतच करून राज्य अभिवृद्धीस पाविले प्रस्तुत स्वामीची सेवा निष्ठापूर्वक करितात यांचे वंशपरंपरेनें चालवणे अगत्य जाणून स्वामी कृपाळू होऊन प्रांत मजकुरची सरदेशमुखी वतन करार करून दिले आहे. वतनाचा उपभोग करतील या वतनास हक्क लाजिमा इनामत व हाली पूर्वील मनदाप्रमाणें देत जाणें प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणे. सित अशर मयां व अलफ छ ९ रमजान ( इ. स. १७१५।१६ ).

याप्रमाणें परशुरामपंतांचा दिवसेंदिवस उत्कर्ष होऊन राजदरबारांत त्यांची चांगली वाहवा होत चालली. पूर्वीं त्यांस अनेक वेळां विविध राजकारणप्रसंगांमध्यें पुष्कळ संकटें व अपमान सोसावे लागले, परंतु सुदैवानें त्यांस शेवटीं चांगली स्थिती प्राप्त झाली. व परमेश्वरकृपेनें त्यांच्या आयुष्याचे शेवटचे दिवस पूर्ण सुखांत व आनंदांत गेले. परशुरामपंतांनीं आपल्याकडील कामाची सर्व जबाबदारी

आपले चिरंजीव श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव यांजवर सोंपवून आपण नेहमीं सातार्‍यास श्रीशाहुमहाराजासंनिध रहात असत. तथेंच त्यांचा जेष्ठ शुद्ध ८ शके १६४० विलंबीनाम संवत्सरीं ह्मणजे ता. २७ माहे मे सन १७१८ सोमवार रोजीं काल झाला. त्यांच्या मृत्यूनें श्रीशाहुमहाराजांस बहुत खेद झाला व सर्व महाराष्ट्रीयांस फार दुःख झालें. त्यांचें वृंदावन संगममाहुली येथें श्री अमृतेश्वर महादेवाचे समोरच आहे. त्याची पुजाउर्जा गलांडे उपाध्ये यांजकडे आहे.

---

## भाग ५ वा.

परशुरामपंत यांना एकंदर पाच पुत्र व दोन कन्या अशीं सात अपत्यें होतीं.

### मुलांचीं नांवें.

कृष्णराव, त्र्यंबकराव, श्रीनिवास ऊर्फ श्रीपतराव, सदाशिवराव, जगज्जीवन ऊर्फ दादोबा. यांपैकीं श्रीनिवासराव हे परशुरामपंतांचे बंधु माधवराव यांना दत्तक दिले होते. कृष्णरावास ताराबाईनें प्रतिनिधी केले होते. म्हणून श्रीशाहुमहाराजांनीं श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव यांचा दत्तकपणा नाहींसा करून त्यांस आपले प्रतिनिधी केले. त्यांच्यावर शाहुमहाराजांची फार मर्जी होती. मुलींपैकीं गोदुबाई ही घुगरदरे यांजकडे दिली होती; व दुसरी येसूबाई ही कोळेकर देशपांडे ह्यांचेकडे दिली होती. दुसरीचा वंश कोळेवाडी येथें आहे.

परशुराम त्रिंबक यांचे वडील चिरंजीव कृष्णराव ह्यांचे वंशज कोल्हापूर येथें पिढीजाद प्रतिनिधी असून सांप्रत ते विशाळगड येथें आपल्या जहागिरीचा उपभोग घेत आहेत. श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव यांचे वंशज सातारचें राज्य खालसा होईपर्यंत सातारच्या छत्रपतीचे पिढीजाद प्रतिनिधी होते. शके १७७० (इ. स. १८४८)सालीं सातारचें राज्य खालसा झालें. नंतर ब्रिटिश सरकारनें त्यांची स्वतंत्र जाहागिर तोडून दिली. ती जाहागीर सांप्रत चालत असून तिचे मुख्य गांव औंध हें आहे. सांप्रतचे औंध संस्थानचे अधिपति श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव ऊर्फ बाळासाहेब पंडित प्रतिनिधी हे आहेत. ते मुंबई युनिव्हर्सिटीचे ग्रॅजुएट असोन नामांकित व प्रसिद्ध चित्रकार आहेत.

प्रतिनिधीकडील कोणत्याही सर्वसाधारण पत्रावर श्रीकाराजवळ 'श्री आईआदिपुरुष' अशीं अक्षरें असतात; आणि शेवटीं 'निदेश समक्ष' 'व राजते–लेखनावधि' अशा अक्षरांचे मोर्तब झाले असतां हुकमी काम पुरें झालें. व श्रीकाराजवळ आई आदिपुरुष; श्रीकाराखालीं प्रतिनिधीपदाचा शिक्का व शेवटीं 'राजते लेखनावधि' अशा अक्षरांचे मोर्तब असले ह्मणजे तो राजपत्राचा कागद पुरा झाला असें समजतात.

---

१ श्री आईआदिपुरुष हीं अक्षरें प्रतिनिधींच्या प्रत्येक पत्राच्या श्रीकाराजवळ लिहिलेलीं असतात. तीं त्यांची कुलस्वामिनी श्रीदेवी इचीं दर्शक म्हणून असतात. ग्रंथमाला मासिकपुस्तकाचे १११ वे अंकांत देवदासकृत संतमालिका छापली आहे. तींत संतांचीं नांवें दिलीं आहेत.

परशुराम त्र्यंबकास श्रीशाहुमहाराजांनीं प्रतिनिधिपद व सरंजाम दिला त्या वेळीं *मोरो शामराव यांस मुतालकीचीं वस्त्रें प्रतिनिधींचे मुतालीक म्हणून दिलीं, असें गोविंद खंडेराव चिटणीसकृत श्रीशाहुमहाराजांचे बखरींत लिहिलें आहे.

## प्रतिनिधींचे कुलस्वामी देव.

१ श्रीदेवी देवघर ( घरांतील देव ) २ श्री मूळपीठ ( औंध ) ३ श्रीयमाई ( औंध ) ४ साखरगड निवासिनी ( किन्हई )

---

त्यांत "आईआदिपुरुष" ह्मणून एका संताचें नांव आलेलें आहे. सदर ग्रंथाचा काल शके १६०८ असलेमुळें त्यांत उल्लेखिलेला संत 'आईआदिपुरुष' हा त्या पूर्वीं हयात होता हें उघड आहे ह्याच 'श्री आईआदिपुरुष' संताचा अनुग्रह परशुरामपंतांस झाला असून त्यांचे वरानें परशुरामपंतांचा ऊर्जितकाळ आला, यास्तव त्यांचें स्मारक म्हणून श्रीकाराजवळ व शिक्क्यांत 'श्री आईआदिपुरुष' असें लिहिण्यास सुरवात झाली, असें म्हणण्यास जागा आहे.

देवदासकृत संतमालिका ग्रंथांत "आईआदिपुरुष" याचे नांवाबद्दल ओंवी आहे ती खालीं लिहिल्याप्रमाणें—

॥ काशिवासी दिधले लक्ष घर ॥ आईआदिपुरुषा दिधला वर ॥
॥ मोरेश्वराचा बडिवार ॥ वाढविला त्वा गोविंदा ॥ ७८ ॥

* मोरो शामराव हे कोण ? —प्रतिनिधि घराण्याचे मुतालीक यमाजी शिवदेव यांचे वंशापैकीं कीं काय ?

५ श्री खंडोबा (आंबवडे) ६ श्रीधानाई (कार्वे) ७ श्री बहिरव (विटे) ८ श्री धोपेश्वर ( विशाळगड ) ९ श्रीकोटभवानी ( कराडकोट ) येणेप्रमाणें आहेत.

विसाजी नारायण जाखी× हे परशुराम त्रिंबक प्रतिनिधींचे कारकीर्दींत १७१५ पासून चिटणिसाचे कामावर होते.

परशुराम त्रिंबक प्रतिनिधि ह्यांच्या वर दिलेल्या संक्षिप्त चरित्रावरून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. त्यांनीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं स्वराज्यसंरक्षण केलें. ह्यावरून त्यांची कर्तृत्वशक्ति व्यक्त होते. शाहू व ताराबाई यांचे तंट्याचे वेळीं यांनीं आपले प्रामाणिकपणाचें व्रत रक्षण करून कारागृहवास स्वसंतोषानें स्वीकारिला. या प्रसंगीं शाहुमहाराजांस त्यांची स्वामिनिष्ठा व तेजस्विता उत्तम प्रकारें दिसून आली. ज्याप्रमाणें परशुरामपंत हे स्वराज्यभक्त व कर्तृत्वशाली पुरुष होते, त्याप्रमाणें ते स्वधर्मनिष्ठ व ईश्वरभक्तही होते. त्यांच्यावर अनेक राजकीय संकटें आलीं; तथापि, तीं त्यांनीं मोठ्या धैर्यानें सहन केलीं व परमेश्वरावर अत्यंत निष्ठा ठेवून, त्यांतून आपली सुटका करून घेतली. अशा संकट प्रसंगीं त्यांनीं आपलें कुलदैवत श्रीजगदंबा व श्रीशंकर यांच्या स्तुतिपर कविता रचल्या आहेत, त्यांतील कांहीं मासल्यासाठीं देतों.

---

× कृष्णाजी हरी चिटणीस राहणार मारुल तर्फ पाटण हल्लीं वस्ती इसलामपूर हे विसाजी नारायण यांचे वंशापैकीं असून प्रतिनिधीकडील इनाम उत्पन्नाचा उपभोग घेत आहेत. त्यांचे संग्रहीं असलेले कागदपत्रांवरून वरील माहिती दिली आहे.

६२२५

### श्लोक.

दुष्टानें जरि पीडिले मज बहू सांग तुला हे हरा ।
अन्यत्राप्रति काय बोलुनि वृथा हीं शीणवावीं गिरा ॥
तूं लोकत्रय पाळिता पुरविता ज्याची जशी भावना ।
या काळीं तुज हेंचि त्र्यंबकसुतें केली असे प्रार्थना ॥ १॥

### आरती.

जयदेवी आदिशक्ती । सुंदर सगुण मूर्ती । आरती ओंवाळिता मनउत्साह प्राप्ती ॥ धृ० ॥ सगूण तूंचि ब्रह्म । सदा आनंद पूर्ण । विश्व हें व्यापियलें । मायारूप धरियेलें ॥ जय० ॥ १ ॥ देव हे सकळ ध्याती ॥ तूझे पाय वंदिती । अभयासी पूर्ण घेती । वेदस्तुति हे करिती ॥ जय० ॥ २ ॥ कीर्तीचे घोष गातां । सदय होई तूं आतां । मागणें हेंचि आहे । परशुरामासि पाहे ॥ जयदेवी० ॥ ३ ॥

### पद.

कृपानिधे अंबिके पाहि मां ॥ धृ० ॥ सुंदरचीरे गुण गंभीरे ॥ धीर उदारे शंकरे ॥ १ ॥ विश्वाधारे जगदाकारे ॥ निगमोद्धारे शंकरे ॥ २ ॥ अपारपारे भवभयहारे ॥ भक्तोद्धारे रेणुके ॥ ३ ॥ पूरितकामे जनाविश्रामे परशुरामं पाल्ये ॥ ४ ॥

यावरून त्यांची कवित्वस्फूर्ति व्यक्त होते. त्यांच्या ईश्वरनिष्ठेमुळें सर्व संकटें परिहार झालीं व त्यांचा शेवट फार चांगला झाला, ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. परमेश्वरकृपेनें परशुरामपंतांसारखे थोर पुरुष आमच्या राष्ट्रांत निर्माण होऊन कालदेशवर्तमानानुरूप उत्तम गुणांनीं स्वदेशास अलंकृत करोत, अशी श्रीजगदंबेजवळ प्रार्थना आहे.